सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ०८ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ९६ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## हिमाचलमध्ये पावसाचा कहर; ढगफुटी आणि पूरामुळे आतापर्यंत ७८ मृत्युमुखी

शिमला : हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आतापर्यंत राज्यात २३ ठिकाणी पूर, १९ ठिकाणी ढगफुटी आणि १६ भूस्खलनच्या घटना घडल्या आहेत. मान्सून सुरू झाल्यापासून ७८ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यापैकी ५० जणांचा मृत्यू पावसाशी संबंधित घटनांमुळे झाला आहे. तर मंडी जिल्ह्यात सर्वाधिक मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे.



हिमाचल प्रदेशात२ राष्ट्रीय महामार्गांसह २४३ रस्ते बंद आहेत. आणि २७८ वीज ट्रान्सफॉर्मर काम करत नाहीत. २६१ जल प्रकल्प बंद आहेत. पुरामुळे नागरिकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे हवामान खात्याने सिरमौर, कांगडा आणि मंडी या तीन जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी केला आहे. तर शिमला, सोलन, हमीरपूर, बिलासपूर, उना, कुल्लू आणि चंबा या ७ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात सतत पाऊस पडत आहे. त्यामुळे नद्या आणि ओढ्यांच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे. ज्यामुळे पूर आणि इतर अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांना अनावश्यकपणे नद्या आणि ओढ्यांजवळ जाऊ नका आणि प्रशासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सतर्क आहे. पण सामान्य जनतेची सतर्कताही अत्यंत महत्वाची आहे.

### अंगणवाडी घोटाळा विधानसभेत गाजला

## मृत मदतनिसाच्या नावाने पगार लाटला, मंत्र्यांना कारवाईस भाग पाडले!

मुंबई: अक्कलकुवा तालुक्यातील एका धक्कादायक अंगणवाडी घोटाळ्याचा मुद्दा आज विधानसभेत चांगलाच गाजला. मृत अंगणवाडी मदतनिसाच्या नावाने खोटी कागदपत्रे वापरून दुसऱ्याच महिलेला पगार दिल्याचा आरोप आमदार आमश्या पाडवी यांनी केला. यावरून सत्ताधारी पक्षाचे आमदारच महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्याविरोधात आक्रमक झाल्याचं चित्र दिसलं आणि अखेर मंत्र्यांना संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची घोषणा करावी लागली.

आमदार आमश्या पाडवी यांनी विधानसभेत प्रश्न विचारला, अक्कलकुवा तालुक्यात एका अंगणवाडी मदतनिसाचा मृत्यू झाला. पण तिला मृत न दाखवता, चुकीची कागदपत्रे वापरून दुसऱ्याच महिलेला पगार सुरू ठेवला. मृत महिलेच्या मुलाने स्वतः माझ्याकडे तक्रार दिली होती. मी वारंवार तक्रार करूनही कोणतीही कारवाई झालेली नाही.

यावर महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी उत्तर दिलं, शांता तडवी या अंगणवाडी मदतनिसाचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या जाऊ यांनी खोटी कागदपत्रे देऊन काम करत होत्या. या प्रकरणी कारवाई करून एफआयआर दाखल केला आहे. सुपरवायझरवरही गुन्हा दाखल केला आहे. मंत्र्यांच्या या उत्तराने मात्र सभागृहात असंतोष वाढला. भाजपा आमदार सुरेश धस यांनी, फेब्रुवारी महिन्यात तक्रार केली असताना मे महिन्यात कारवाई केली जाते? याविषयी डेप्युटी सीईओ आणि सीडीपीओ यांनाही निलंबित करा, अशी मागणी केली.

विशेष म्हणजे, या प्रकरणात सत्ताधारी भाजपा आणि शिवसेनेचे आमदारच मंत्री आदिती तटकरे यांच्याविरोधात अधिक आक्रमक झाले होते, तर विरोधक मात्र शांत दिसले. मंत्र्यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने सत्ताधारी सदस्यांनी आपला आक्रमक पवित्रा कायम ठेवला.

## एकाच कुटुंबातील चौघांची आत्महत्या

पंढरपूर: आषाढी एकादशीच्या मंगलमय वातावरणात विठुरायाच्या पंढरपूरनगरीत एक अत्यंत धक्कादायक घडली आहे. पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे कौटुंबिक वादातून एकाच कुटुंबातील चार सदस्यांनी आपले जीवन संपवले आहे. पत्नी, दोन मुले आणि पतीने केलेल्या आत्महत्येमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कासेगाव येथील रहिवासी म्हमाजी आसबे यांच्या कुटुंबात ही दुर्दैवी घटना घडली. पती म्हमाजी आसबे (वय अंदाजे ३०-३५) यांच्या द्राक्षबागेतील विहिरीत त्यांची पत्नी मोनाली आसबे (वय २५), मुलगा कार्तिक (वय ६) आणि मुलगी प्रगती (वय ४) यांनी उडी मारून आत्महत्या केली.

## १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी आरिफ ३२ वर्षांनी सापडला

मुंबई : १९९३ च्या जातीय दंगलीतील एका हायप्रोफाइल प्रकरणात पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. आरोपी गेल्या ३२ वर्षांपासून फरार होता. तीन दशकांनंतर तो आढळल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. १९९३ च्या दंगलीतील आरोपी आरिफ अली हशमुल्ला खानला मुंबई पोलिसांनी ३२ वर्षांनंतर अटक केली आहे. खानवर हत्येचा प्रयत्न आणि जातीय दंगली भडकवणे असे गंभीर आरोप आहेत. पोलिसांनी त्याला उत्तर प्रदेशात शोधून काढले आणि वडाळा येथून अटक केली, त्यानंतर त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.



वडाळा पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी आरोपीची ओळख आरिफ अली हशमुल्ला खान (५४) अशी केली आहे. मुंबई पोलिस आयुक्तांच्या सूचनेनुसार वॉन्टेड आणि फरार आरोपींसाठी सुरू असलेल्या शोध मोहिमेचा एक भाग म्हणून ही अटक करण्यात आली.

जातीय दंगली भडकवल्याचा आरोप

१९९३ मध्ये मुंबईत झालेल्या जातीय दंगलीदरम्यान आरिफ अली हशमुल्ला खान यांच्यावर गंभीर आरोप दाखल करण्यात आले होते. यामध्ये खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमवाजमव आणि इतर गुन्ह्यांशी संबंधित भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांचा समावेश होता. दंगलीनंतर खान फरार झाला आणि स्थानिक न्यायालयाने त्याला फरार घोषित केले.

हशमुल्ला उत्तर प्रदेशात लपला होता

पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणात बराच काळ कोणताही सुगावा लागला नव्हता. तथापि, अलिकडेच मुंबई पोलिसांनी फरार आरोपींना पकडण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली. या मोहिमेअंतर्गत, पोलिसांचे एक पथक उत्तर प्रदेशात गेले, जिथे आरोपी खान लपून बसल्याची शक्यता होती. तेथे मिळालेल्या सुगावा आणि एका विशेष माहितीच्या आधारे, पोलिसांनी मुंबईतील वडाळा परिसरातील दिन बंधुनगर अँटॉप हिल येथून हशमुल्ला खानला अटक केली.

ही अटक अचूक गुप्त माहिती आणि पोलिसांनी केलेल्या तत्पर कारवाईचे परिणाम आहे. हशमुल्ला खानला अटक केल्यानंतर त्याला स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीनंतर न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवले. या अटकेकडे मुंबई पोलिसांचे मोठे यश म्हणून पाहिले जात आहे. मुंबई पोलिस आयुक्तांनी सर्व पोलिस ठाण्यांना जुन्या आणि गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याचे निर्देश दिले आहेत. पोलिस आता या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत जेणेकरून इतर सहभागी व्यक्तींचाही शोध घेता येईल.

## नागपूर व अमरावती जिल्ह्यातील वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे गतीने करा : मुख्यमंत्री

मुंबई: नागपूर व अमरावती जिल्ह्यात उद्योग, निवासी प्रकल्प आणि वाणिज्य क्षेत्रामुळे वीज मागणी झपाट्याने वाढते आहे. नागपूर व अमरावतीमधील वीज क्षेत्रातील कामांसाठी मंजूर निधीतील कामे गतीने करावीत. तसेच सन २०३५ मध्ये भविष्यातील वाढणारी लोकसंख्या लक्षात वीज मागणीसंदर्भात तातडीने नियोजन करावे, दोन्ही जिल्ह्यात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विधानभवन येथे नागपूर जिल्हा महावितरण आणि महापारेषण तसेच कोराडी, खापरखेडा प्रकल्पांसंदर्भात आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, वित्त राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार आशिष देशमुख, आमदार मोहन मते, आमदार प्रविण दटके, आमदार चरणसिंग ठाकूर उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नागपूर जिल्ह्यामध्ये वीज क्षेत्रातील मागणी वाढत आहे. विविध पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढली असून विजेची मागणी देखील वाढत आहे. नागपूर व अमरावती जिल्हयासाठी मंजूर वीज क्षेत्रातील विकासासाठी सध्या मंजूर निधीतून कामे पूर्ण करावीत आगामी कालावधीत अजूनही विविध नवीन प्रकल्प येत आहेत त्यासाठी ऊर्जा विभागाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. वीज क्षेत्रातील कामांसाठी नागपूर मध्ये ७१३ कोटी तर अमरावती जिल्ह्यात २४२ कोटी रूपये निधीची आवश्यकता भासणार आहे यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी.

## रायगड किनाऱ्यावर आली संशयास्पद बोट, सुरक्षा वाढवली

### प्राथमिक तपासात दुसऱ्या देशाची बोट रायगड किनाऱ्यावर वाहून आल्याचा संशय

रायगड: रायगडच्या समुद्र किनाऱ्यावर एक संशयास्पद बोट दिसल्यामुळे, परिसरात खळबळ निर्माण झाली आहे. या बोटीचा अलर्ट मिळाल्यानंतर रायगड पोलिस, बॉम्ब डिस्पोजल स्क्वॉड, क्विक रिस्पॉन्स टीम, नौदल आणि तटरक्षक दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील रेवदंडा किनाऱ्याजवळ एक संशयास्पद बोट दिसल्याने किनारी भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पोलिसांनी रविवारी ही माहिती दिली. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, रेवदंडाच्या कोरलाई किनाऱ्यापासून सुमारे दोन नॉटिकल मैल अंतरावर सुरक्षा दलांना ही बोट दिसली.



सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी पोहोचल्या बोटीची माहिती मिळताच, रायगडच्या पोलिस अधीक्षक आंचल दलाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी किनाऱ्यावर पोहोचले. तथापि, मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे त्यांना बोटीपर्यंत पोहोचण्यात मोठी अडचण आली.

दलाल स्वतः एका बार्जमधून बोटीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होते, परंतु खराब हवामानामुळे त्यांना परतावे लागले. खबरदारी म्हणून, परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिस दल तैनात करण्यात आले आहे आणि जिल्ह्यात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

१९९३ साली रायगड जिल्ह्यातील शेखाडी बंदरावर आरडीएक्स उतरवले गेले होते. ज्यामुळे मुंबई बॉम्बब्लास्टने हादरली होती. ती घटना लक्षात घेता, भविष्यात असा अनुचित प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी पोलिस यंत्रणा डोळ्यात तेल घालून संबंधित बोटिची तपासणी करत आहेत.

## तालुक्यातील १३८ सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०७ जुलै - तालुक्यातील वेगवेगळ्या प्रवर्गासाठी २०२५ ते २०३० या पाच वर्षाकरीता गठीत होणाऱ्या ग्रामपंचायती करीता १४० ग्रामपंचायती पैकी १३८ ग्रामपंचायती च्या सरपंच पदाचे आरकक्षण निवडणूक आयोगाच्या आदि सुचने प्रमाणे दुसर्यांदा काढण्यात आले अगोदर हे आरक्षण ८ एप्रिल रोजी काढण्यात आले होते.थोड्या फार गावांचे आरक्षण बदलता बाकी गावांचे आरक्षण तेच ठेवण्यात आले.

दि .७ जुलै सोमवार. रोजी सकाळी ११ ते १ वाजे दरम्यान तहसील कार्यालयाच्या हॉलमध्ये समृध्दी नाना जाधव (वय १२) व शाकीर शेख (वय ६ ) यांच्या हस्ते

उपविभागिय अधिकारी संतोष गोरड,तहसीलदार विद्याचरण कडवकर,गटविकास



अधिकारी चंद्रहार ढोकणेनायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे,

प्रशांत काळे, यांच्या उपस्थित काढण्यात आले यासाठी चंद्रशेखर सौंदांनकर,जगदीश चव्हाण, तलाठी दीपक एरंडे ,भगवान शीसोदे , उमेश मगर,एकनाथ महाजन , जनार्दन भालकर यांनी परिश्रम घेतले.

तर रेऊळगाव व भिलदरी ग्रामपंचायतीचे आरक्षण नंतर काढण्यात येईल.

आरक्षण खालील प्रमाणे ( आरक्षण प्रवर्ग त्यापुढे गावाची नावे)

**अनुसूचित जाती महिला राखीव :** खामगाव , रुईखेडा , लामनगाव , अंधानेर , निंभोरा वाकी ज .

**अनुसूचित जाती :** चिंचोली ली , वाकद , ताडपिंपळगाव , सासेगाव , हिवरखेडा गौ , मुंडवाडी

**अनुसूचित जमाती महिला राखीव :** चिंचखेडा खु , निपाणी , मक्रणपूर रिठ्ठी , वडाळी.

**अनुसूचित जमाती:** नागापूर,देवळाना , जवळी खु. बु., गणेशपूर ,

**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव :** कुंजखेडा , ब्राम्हणी , बनशेंद्रा , आठेंगाव , टाकळी बु , जवखेडा बु.दहिगाव , नेवपूर जा , नादरपूर , निंमडोंगरी , माटेगाव , बोरसर खु , पळशी बु , आलापूर , लंगडा तांडा , हरसवाडी , बहिरगाव , उबरखेड तांडा , रामपूरवाडी ,

**नागरिकांचा मागास प्रवर्ग :** पळशी खु , जळगाव घाट , सारोळा , तेलवाडी , नावडी , नाचनवेल , आडगाव जे , विटखेडा , वासडी , सोनवाडी , घुसूर , देभेगाव , डोंगरगाव , पिशोर, वदोड , जैतखेडा , पळसखेडा, कळंकी, करजंखेडा जा.

**सर्वसाधारण महिला राखीव :** चापानेर , चिकलठाण , नागद , बोरसर बु , रेल , अंबाला , चिंचखेडा बु , हस्ता , उपळा , हसनखेडा , दिगावखेडी , जेहुर , भांबरवाडी , गौरपिंप्री , जैतापूर , बरकतपुर , आमदाबाद , वडनेर , गुदमा , शेलगाव , अंबा , घाटशेंद्रा , नेवपूर खा , चिमनापूर, सावरगाव , तपोवन , खेडा , रोहिला खु , भारंबा , डोणगाव , मोहरा , बेलखेडा , मुंडवाडी तांडा , तळणेर , उबंरखेडा , हातनूर , सितानाईक तांडा , रामनगर , जामडी जा. टापरगाव

**सर्वसाधारण :** आडगाव पि , भोकणगाव , लोहगाव , शिरोडी , माळेगाव ठो , जवखेडा खु. , दाभाडी , नागदतांडा , अंबातांडा , जैतखेड तांडा , औराळा , कानडगाव क , देवपुडी , पिंपरखेडा , चांभारवाडी , देवगाव रं , गव्हाली , धामणी खु , औराळी , वडगाव जा , मेहेगाव , खातखेडा , जामडी घाट , हिवरखेडा ना , देवपुळ , गराडा , कोळवाडी , विटा , शिवराई , तांदुळवाडी , भारंबा तांडा , कोळंबी मा , बिपखेडा , शिरसगाव , टाकळी अ , सातकुंड , कळंकी. सायगव्हाण, टाकळी ल. भिलदरी पी.

## जिल्हाधिकारी यांच्याकडून 'आओ गाँव चले' उपक्रमाचे कौतुक

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ जुलै २०२५ - इंडियन मेडिकल असोसिएशन (खच-) छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्ताने खच- उेपपशलीं या समाजोपयोगी उपक्रमात स्वयंसेवी सेवा देणाऱ्या डॉक्टर्सचा सत्कार तसेच विविध शैक्षणिक संस्थांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा खच- हॉल, समर्थ नगर येथे अत्यंत उत्साही आणि सन्मानपूर्वक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खच- अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. दिलीप स्वामी (जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते. यावेळी खच- सचिव डॉ. योगेश



लक्स, बिल्डिंग व प्लॉट कमिटी अध्यक्ष डॉ. यशवंत गाडे, माजी अध्यक्षा डॉ. उज्वला दहिफळे हे मंचावर उपस्थित होते.

या वेळी खच- च्या उपक्रमांनी जिल्ह्याच्या आरोग्याचे चित्र बदलले, ग्रामीण जीवनातही उपचार व मार्गदर्शन पोचवले.

डॉक्टर्स समाजाचे खरे हिरो आहेत हे मी आज पुन्हा पाहिले,विद्यार्थ्यांनाही स्वप्नांच्या दिशेने झेप घ्यायला प्रेरणा दिली!शिक्षण हे केवळ गुणांपुरते मर्यादित नसते, तर जीवनातील दिशा ठरवते,प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःवर विश्वास ठेवून ध्येयाच्या दिशेने चालावे.समाजासाठी कार्य करणं हीच खरी यशस्वीतेची ओळख असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले.

खच- उेपपशलीं या उपक्रमांतर्गत शहरातील तसेच ग्रामीण भागात आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती, आणि प्राथमिक वैद्यकीय सेवा देण्यात आल्या होत्या. यामध्ये ४० पेक्षा अधिक डॉक्टर्सनी निस्वार्थ योगदान दिले. या सेवेचा लाभ हजारो नागरिकांना झाला.

कार्यक्रमात अशा ४० स्वयंसेवी डॉक्टर्स आणि ५० गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. संजय पाटणे यांच्या मार्गदर्शनाखाली खच- डॉक्टर्सनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. विविध प्रेरणादायी गीते सादर करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे डॉ. असावरी टाकळकर, डॉ. अपर्णा राऊळ, डॉ. गीतेश दळवी, डॉ. प्रशांत दरख, डॉ. शिवाजी पोळे आणि डॉ. संभाजी चिंतळे यांनी केले.

## मंत्रालयात आदिवासींच्या जागा बिगर-आदिवासींनी बळकावल्याचा आरोप

मुंबई: मंत्रालयातील विविध विभागांमध्ये आदिवासींसाठी राखीव असलेल्या अनेक जागा बिगर-आदिवासी कर्मचाऱ्यांनी बळकावल्याचा गंभीर आरोप आज विधानसभेत करण्यात आला. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

आमदार भीमराव केराम यांनी विधानसभेत प्रश्न विचारला की, आदिवासी विभागातील ५० हून अधिक जागा गैर-आदिवासींनी बळकावल्या आहेत. विशेष म्हणजे, सामान्य प्रशासन विभागाने या ५० पदांची माहिती आपल्याकडे नसल्याचं उत्तर दिलं आहे. माहितीच्या अधिकारात माहिती देण्यासही टाळाटाळ केली जात आहे. आदिवासींची ही पदे कधी भरली जातील आणि ही भरती झाल्यास यादी देण्यात येईल का?

यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर देताना, ही वस्तुस्थिती असल्याचं मान्य केलं. ते म्हणाले, २००५ पूर्वी भरती झालेल्यांना व्हॅलिडिटी सर्टिफिकेट मागायचो. १९९५ नंतर कुठलेही संरक्षण मिळालं नाही, काहींची नोकरी समाप्त करून त्यांना अधिसंख्य पदावर घेण्यात आलं. आता शेड्युल ट्राइबची भरती बिंदू नामावलीनुसार करण्याचं ठरलं आहे. उर्वरित भरतीबाबत प्रक्रिया सुरू आहे. आता जी भरती प्रक्रिया सुरू होणार आहे, त्यात शेड्युल कास्टची रिक्त पदे भरली जातील.

१२ हजार ५२० पदे गैर-आदिवासींना? नितीन राऊतांचा गंभीर आरोप

काँग्रेस नेते नितीन राऊत यांनीही या मुद्द्यावर सरकारला घेरलं. ते म्हणाले, १२ हजार ५२० पदे गैर-आदिवासींना देण्यात आली आहेत, याबाबत अजून निर्णय झालेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागात आदिवासींची २९ पदे तर 'गायब' झाली आहेत. बिगर-आदिवासींनी बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे किती जागा बळकावल्या याची माहिती देणार का? आणि गायब झालेल्या २९ पदांची माहिती देणार का?

यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिलं, आम्ही एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती केली आहे. ६ हजार ८६० असे जण आहेत ज्यांच्याकडे प्रमाणपत्र नाही, त्यांना आम्ही अधिसंख्य पदावर नेलं. १३४३ पदे आम्ही भरली आहेत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लाल बहादूर शास्त्री विद्यालयात एनसीसी कॅडेटतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.७ जुलै -**

येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी एनसीसी कॅडेट तर्फे भारतीय वंशाच्या वृक्षांची लागवड विद्यालयाच्या परिसरात करण्यात आली. याप्रसंगी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासूणे, माजी मुख्याध्यापक नेलवाडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले व अभ्यास पूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे, निलेश मांडवकर, विज्ञान विषय शिक्षक राहुल नेटके, संदीप बोधनकर, क्रीडा शिक्षक संतोष कोले, एनसीसी विभागप्रमुख विष्णू तेलंग व महाराष्ट्र फिफ्टी थ्री बटालियन एनसीसी ऑफिस लातूर येथील हवालदार शिवशंकर निकम, रवी कुमार व विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### पीएम श्री केंद्रीय विद्यालय बीएसएफ चाकूरला उत्कृष्ट निकालाबद्दल प्रशंसापत्र

**चाकूर, दि.७ जुलै -**

आयआयटी मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या वार्षिक प्राचार्य परिषदेत पीएम श्री केंद्रीय विद्यालय बीएसएफ चाकूरने दहावी (एआयएसएसई) आणि बारावी (एआयएसएससीई)च्या परीक्षांमध्ये १०० टक्के निकाल साध्य केल्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य हरीश कटारिया यांना केंद्रीय विद्यालय संघटन, मुंबई विभागाच्या वतीने उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. हे प्रमाणपत्र केव्हीएस मुंबई प्रादेशिक कार्यालयाच्या उपायुक्त शाहिदा परवीन यांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमाला विभागाचे सहाय्यक आयुक्त समज जोगळेकर, रायमालू सोकल्ला, सुमित मेहरा आणि ए.पी. कच्छप यांची प्रमुख उपस्थिती होती. या यशामध्ये विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक योगदानाचा आणि कठोर परिश्रमाचा मोठा वाटा असल्याचे गौरवपूर्वक नमूद करण्यात आले.



### जि.प. शाळेत शैक्षणिक वारकरी पालखी

**निलंगा, दि.७ जुलै -**

शिक्षणाची वारी आपल्या दारी जि.प.के.प्रा.शा. हाडगा, ता. निलंगा येथे आषाढ़ी एकादशी निमित्त पालखी सोहळा उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. माऊली माऊली, विठ्ठल नामाची शाळा भरली, पंढरीचा विठ्ठल कुणी पाहीला, विठुरयाची पंढरी इत्यादी भजने अभंग विद्यार्थ्यांनी सादर केले. ग्रामस्थ, महिला भगिनी, शिक्षक, विद्यार्थी, अंगणवाडीताई यांनी फुगड्या व फेर धरूण दिंडित सहभागी झाले. या सोहळ्यात पालखीत विठ्ठल रुक्मिणी मूर्ती ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमात गावातील सरपंच अनुपूर्णा वाघमारे, शा. व्यवस्थापन समिती अध्यक्ष खंडू भोकरे, मु.अ. दिवे डी.आर., राजेश मंदाडे, डी.के. सूर्यवंशी, विजयसिंह पाटील, राजेश्री भिसे, अंजना बरेवाड़, कल्पना लामतुरे, कौशल्या कांबळे, विद्यामती पांचाळ यांनी सहभाग घेतला.



### तहसीलदार किशोर यादव यांचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.७ जुलै -**

नळदुर्ग येथील अप्पर तहसीलदार किशोर यादव यांनी शिरूर अनंतपाळचे नवीन तहसीलदार म्हणून मंगळवारी (१ जुलै) पदभार स्वीकारला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा शिरूर अनंतपाळतर्फे त्यांचा पुष्पहार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उत्तमराव कदम, राजनारायण बिराजदार, शंकर मिटकर, हणमंत जाधव, टीपराळचे सरपंच नरसिंग कुंभार, उत्तम दंडेवाड, भागवत चिंचोलकर आदी उपस्थित होते. महसूल प्रशासनातील कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून किशोर यादव यांची ख्याती आहे.

# बिटरगाव येथे किशोरी कलापथकातून बालविवाह मुक्तीचा संदेश

### पालकांना मुलींच्या शिक्षणावर भर देण्याचे आवाहन...



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.७ जुलै -**

रेणापूर तालुक्यातील बिटरगाव येथे नुकत्याच आयोजित किशोरी कलापथकाच्या कार्यक्रमातून बालविवाह आणि बालमजुरीला विरोध करत मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. कलापंढरी संस्थेच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या या जनजागृती कार्यक्रमात पालकांनी आपल्या मुलींचा बालविवाह न करता त्यांना पदवीपर्यंत शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे जाहीर आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे रेणापूर तालुका संघटक कृष्णा वाघमारे यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी उपसरपंच अनुसया गाडे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून राजाभाऊ गाडे, शालेय समिती अध्यक्ष गोपाळ आलापुरे, ग्रामबाल संरक्षण समितीच्या शालू साके, मंगल धुळे, अनिता म हाके, सुमित्रा साखरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. त्यानंतर किशोरी कलापथकाच्या मुलींनी नाटिका, नृत्य आणि इतर सांस्कृतिक सादरीकरणांच्या माध्यमातून बालविवाह आणि बालमजुरीविरोधातील संदेश प्रभावीपणे मांडला.

मुलींनी पालकांना आवाहन केले की, मुलींना शाळेतून बाहेर काढून शेतकामासाठी किंवा अन्य मजुरीसाठी पाठवू नये, तर शिक्षणाच्या प्रवाहात ठेवून त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

कलावंतांनी आपल्या सादरीकरणातून स्पष्ट केले की, बालविवाह करणाऱ्या पालकांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते, तसेच बालमजुरी करुन घेणाऱ्या मालकांवरही कठोर कारवाई होईल. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कलावंतांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमाचे प्रास्ताविक मधुकर गालफाडे यांनी, सूत्रसंचालन आसमा शेख यांनी तर आभार प्रदर्शन धनराज पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धनराज पवार, जयवंत जंगापल्ले, मधुकर गालफाडे, सुप्रिया रामदासी, शालू साके, राजू गोरे, सुप्रिया गोरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला महिलांसह पुरुष आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कलापंढरी संस्था गेल्या ३८ वर्षांपासून बालकांच्या हक्कांसाठी कार्यरत असून, संस्थेचे मार्गदर्शन बी. पी. सूर्यवंशी करतात.

## वडगाव जि.प. शाळेत आषाढी एकादशीनिमित्त शिक्षणाची दिंडी

### यावर्षीही शाळेचा अनोखा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.७ जुलै -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव येथे आषाढी एकादशीनिमित्त भक्तिभावात न्हालेली शिक्षणाची दिंडी मोठ्या उत्साहात पार पडली. या विशेष दिंडीची सुरुवात गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून झाली असून ती हनुमान मंदिरापर्यंत नेण्यात आली.

दिंडीत विद्यार्थ्यांसोबत पालक, ग्रामस्थ तसेच महिला-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शाळा व्यवस्थापन समितीचे



अध्यक्ष नागनाथ माने यांनी फुगडीच्या तालावर सहभागी होत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

गावातील महिला तसेच पुरुषांचाही सहभाग होता. गावातील युवा पिढी तसेच शरद पाटील हे या दिंडीमध्ये सहभागी होते.

चिमुकल्यांच्या विठ्ठल-विठ्ठल नामस्मरणाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात गुडे पल्लवी, साळुंखे सुकुमार, शिवाजी बालोरे, मुख्याध्यापक धर्मप्रकाश लखने, दत्तात्रय मस्के, ओमप्रकाश झिन्नेवाड व आम्रपाली वाळके यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## रोटरी क्लब लातूरचा पदग्रहण समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ जुलै -**

रोटरी क्लब लातूरच्या वतीने शनिवार, ५ जुलै रोजी राधिका कन्व्हेन्शन हॉलमध्ये आयोजित पदग्रहण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी जपत क्लबने ६ गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेतले, तसेच १० शालेय विद्यार्थ्यांना रेंजर सायकलचे वाटप केले.

समारंभाचे प्रमुख पाहुणे रोटरीचे डीजी सुधीर लातुरे आणि मोहन कुमार के.व्ही. होते. मंचावर नूतन अध्यक्ष ज़कीखान कायमख़ानी, सचिव विश्वनाथ निगुडगे आणि माजी अध्यक्ष श्रीमंत कावळे उपस्थित होते.

यावेळी रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ ॲसपायरेशन लातूरचाही पदग्रहण सोहळा झाला. नूतन अध्यक्षपदी कौशल्या जांबुवंतराव सोनकवडे, तर सचिवपदी वनिता सुदेश लचुरिया यांची निवड झाली.

पूर्व अध्यक्ष श्रीमंत कावळे यांनी गतवर्षातील कामांचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोपाल बाहेती यांनी केले, तर आभार सचिव विश्वनाथ निगुडगे यांनी मानले.

या कार्यक्रमाला विनोद लड्डा, मोहन परदेशी, रामप्रसाद राठी, प्रवीण होळीकर, हर्षद राजूरकर यांच्यासह शहरातील अनेक रोटरीयन्स आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त आबासाहेब इंग्लिश स्कूलच्या वतीने शिक्षणाची वारी



**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.७ जुलै -**

देवणी येथील आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजतर्फे आषाढी एकादशीनिमित्त 'शिक्षणाची वारी' (दिंडी) उत्साहात आणि धार्मिक वातावरणात काढण्यात आली.

या वारीच्या पालखीचे उद्घाटन जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणीचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला कुशावर्ता बेळे, प्रशांत घोलपे, देविदास पतंगे, प्रताप कोयले, पंढरीनाथ शिवपुरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दिंडीचे औक्षण केल्यानंतर पालखी बोरोळ चौक ते विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत नेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून नृत्य सादर केले, त्यामुळे वातावरणात भक्तिभाव आणि उत्साह दाटून गेला.

दिंडीची सांगता मंदिरात आरती करून करण्यात आली.

## मोहर्रमनिमित्त उसळला जनसागर; सवारी मिरवणुकीत राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

### शेकडो वर्षांची परंपरा कायम...

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.७ जुलै -**

लातूर जिल्ह्यात मोहर्रम सणासाठी प्रसिद्ध असलेल्या देवणी तालुक्यातील वलांडी येथे मोहर्रमच्या दहाव्या दिवशी, रविवार दि.६ जुलै रोजी, शेकडो वर्षांची परंपरा जपत हजारो भाविकांच्या उपस्थितीत पारंपरिक सवारी मिरवणुका मोठ्या उत्साहात पार पडल्या.

दरवर्षीप्रमाणे यंदाही बडे नालसाब, छोटे नालसाब, हुसेन बाशा आणि मौलाली या सवारींच्या मिरवणुका गावातील ठरलेल्या मार्गाने मोठ्या थाटामाटात निघाल्या. या मिरवणुकांमध्ये विविध धर्मीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला, ज्यातून वलांडीतील सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रत्यय आला. मोहरमच्या नवव्या दिवशी रात्री दोन वाजता तसेच दुपारी दोन वाजता मौलाली सवारी निघाली. परंतु परंपरेनुसार सातव्या दिवशी निघणारी इमामे कासीम सवारी यावर्षी दोन गटांमध्ये मतभेद झाल्याने निघू शकली नाही.

मोहरमच्या निमित्ताने मुंबई, हैदराबाद, पुणे, मद्रास आदी शहरांमधून स्थलांतरित ग्रामस्थ व भाविक वलांडीत दाखल झाले होते. त्यामुळे संपूर्ण गावाला यात्रेचे स्वरूप आले होते. विविध सामाजिक संघटनांच्या वतीने ठिकठिकाणी शरबत वाटपाची व्यवस्था करण्यात आली होती. ज्यामुळे आलेल्या भाविकांना दिलासा मिळाला.



### पंढरपुरनंतर मराठवाड्यातील प्रति पंढरपुर पानगांवात उसळला भाविक भक्तांचा महापुर...

# आषाढी एकादशीनिमित्त पानगांवात भरला हजारों वैष्णवांचा मेळा

### माले व गुडे परिवाराच्या वतीने ९ लाख ५१ हजार रुपयाच्या रथाचे लोकार्पण... पांडूरंगाच्या दर्शनाकरिता जिल्हाभरातुन पायी दिंडया पांडूरंगाचा गजर पानगांवात दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.७ जुलै -**

मराठवाड्यात प्रति पंढरपुर म्हणुन ओळख आसलेल्या रेणापुर तालुक्यातील पानगांव येथे हेमाडपंथी विठठल-रुक्मीनी मंदीर असून दरवर्षी आषाढी एकादशीनिमित परिसरातील विठ्ठलभक्त वेगवेगळ्या दिंड्या पांडूरंगाचा गजर करित पांडूरंगाच्या चरणी लीन झाल्या असुन ज्यांना पंढरपुर जाणे शक्य झाले नाही असे हजारों वारकरी, वैष्णवांनी गर्दी केल्याने पानगांवात भाविक भक्तांचा जणु महापुरच लोटल्याचे चित्र पहावयास मिळाले.

दरवर्षा प्रमाणे आषाढी एकादशी निमित आदल्या दिवशी शनिवार (दि.५) रोजी लातुर येथुन कामखेडा येथील हरी भक्त माले आणि गुडे परिवाराच्या वतीने ९ लाख ५१ हजारांचा माऊलीचा रथ आणि योगीराज सिरसाट, गोकुळ राठोड, ग.भा. वेणुबाई बडे यांनी रथात १ लाख ६० हजार रुपयांच्या दिड किलो चांदीच्या माऊलीच्या पादुका अर्पन केलेल्या रथासह तसेच भगीरथ लाहोटी यांच्या स्मरणार्थ मुरुडच्या सुषमा चांडक यांनी दिलेल्या पालखीसह शेकडो अबाल वृद्ध पायी दिंडी घेवुन रात्री आठ वाजता पानगांवांत दाखल झाले होते. विठ्ठल-रुक्मिणी मंदीरात सकाळी ब्रम्हवृंद दिलीपदेव पाठक यांच्या वेद व मंत्रोचारात रेणापुरच्या दंडाधिकारी तथा तहसीलदार यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला. यावेळी मंदीर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. विठ्ठल-विठ्ठल विठ्ठला-पांडूरंग विठ्ठला. ग्यानबा-तुकाराम, हरी नामाचा गजर करीत पानगाव आणि परिसरातून अनेक गावो गावच्या दिंड्या येत होत्या. त्यांच्या दिंडीचे पूजन, सत्कार, मंदीर समितीच्या वतीने करण्यात येत होते. मंदिर परिसरात चिमुकल्यासह वयोवृद्धांनी पावले खेळत फुगडीचा आनंद लुटला.





यानिमित्त मंदीर परिसरात लागणाऱ्या दुकानांच्या जागेची व्यवस्था करण्यात आली होती. गावा गावातुन पायी येणाऱ्या दिंडीतील भक्तांच्या दर्शनासाठीची वेगळी व्यवस्था करण्यात आली होती.पाऊसापासुन बचाव व्हावा म्हणुन दर्शन रांगेवर वॉटरप्रूफ मंडप टाकण्यात आला होता. मंदिर समिती आणि अनेक वैयक्तीक हरी भक्तांकडून दर्शना करिता येणाऱ्यां भावीक भक्तांची फराळ म्हणुन साबुदाना खिचडी, केळी आणि पिण्याच्या शुध्द पाण्याची मोफत दिवसभर व्यवस्था केली गेली होती.

मंदिरामध्ये फुलाचे डेकोरेशन तसेच मंदिरावर लाइटिंग व्यवस्था, पाणी व्यवस्था करून ठेवली होती. लातुर आणि अहमदपुर येथील ब्लड बॅकच्या वतीने रक्तदान संकलन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर पांडूरंगाच्या दर्शनाकरिता येणाऱ्या भाविक भक्तांची गर्दी वाढतच जात होती. लातुर, बीड जिल्ह्यातुन भावीक भक्त विठ्ठल नामाचा गजर येत आसल्याने दर्शनाकरिता भक्तांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. गर्दी वाढणार हे ओळखुन मंदीर समिती आणि गावकरी मंडळीनी भक्तांची कसलीही गैरसोय होणार नाही याकरिता वेग वेगळ्या समित्या गठीत केल्या होत्या. तर रेणापुर पोलीस स्टेशनचे पो. नि. दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनात पानगांव पोलीस दूरक्षेत्राच्या सपोउनि. श्रीधर कांदे, नामदेव सारोळे, राजेंद्र घोगरे, परमेश्वर शेळगे यांच्या देखरेखी खाली महिला-पुरुष १६ पोलीस शिपाई, होमगार्ड यांनी गर्दीवर नियंत्रण ठेवण्या करिता मंदीर समितीच्या पदाधिकारी आणि गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

रामवाडी, मुसळेवाडी, फावडेवाडी, गोविंदनगर, चुकारवाडी, भंडारवाडी,सारोळा, बाभळगांव, खंडोबा गल्ली, निरपणा, नरवटवाडी, गोपाळवाडी, यशवंतवाडी, मुरढव सह इतर गांवाच्या शेकडो महिला पुरुष पायी पायी दिंड्या घेवुन येत विठु-रखमाईचा जागर करीत हरीच्या चरणी लीन झाल्या होत्या.

येथे असलेल्या १२ व्या शतकातील हेमाडपंथी विठ्ठल रुक्मीनी मंदीराची प्रतिपंढरपुर म्हणुन झाल्याने नमो तिर्थ विकास योजने अंतर्गत या मंदीराची निवड झाल्याने या मंदीराच्या जिर्णोदारा करिता ९ कोटी ५० लाख रुपयाचा निधी मंदीर समिताला मिळाल्याने मंदीराचे पाडकाम करण्यात आल्याने यावर्षी आलेल्या भाविक भक्तांची विठठल-रुक्मीनीच्या प्रतिमांची इतरत्र व्यवस्था करून दर्शनाची सोय करण्यात आल्यामुळे मंदीर समिती आणि गावकर्यांना भक्तांच्या दर्शना करिता विशेष परिश्रम करावे लागले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नाथसागरच्या पाणीपातळीत वाढ; पाणीसाठा ५५ टक्के

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ :- नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यात धो-धो कोसळत असलेल्या पावसामुळे तेथील नादींना पूर आला असून त्या पुराच्या पाण्याची आवक मोठया प्रमाणात नाथसागर धरणात होत असल्याने जायकवाडी प्रकल्पाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. सोमवार दिनांक ७ जुलै सायंकाळी ६ वाजता धरणात ४२ हजार २२३ क्युसेक प्रमाणे पाण्याचा ईनफ्लो असून पाण्याची टक्केवारी ही ५५ टक्के एवढी झाली आहे.



नाथसागर जलाशयाच्या दिशेने मोठा जलऔघ आशयाची बातमी काल दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. २४ तासांत धरणाच्या पाणीसाठयात झपाट्याने वाढ होणार असे बातमीत स्पष्ट करण्यात आले होते. याला अनुसरून गेल्या २४ तासांत नाथसागर धरणाचा पाणीसाठा हा ५ टक्यांनी वाढला आहे. असे असतांना आता येणाऱ्या पाण्याची आवक पुन्हा वाढल्याने जायकवाडी धरणाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे.धरणात ४२ हजार २२३ क्युसेक प्रमाणे पाण्याची आवक होत असून पाण्याची टक्केवारी ही ५५ टक्के एवढी झाली आहे. धरणाचा एकूण पाणीसाठा हा १९२०.१६२ दलघमी इतका असून त्यात उपयुक्त पाणीसाठा हा ११८२.५६ एवढा झाला आहे. धरणात येणाऱ्या पाण्याची आवक पाहता मंगळवारी दिनांक ८ जुलै रोजी पाणीपातळीच्या टक्केवारीच्या बाबतीत नाथसागर ६० ओलांडेल असे चित्र आहे. नाथसागर जलाशयाचा दिशेने नांदूर मधमेश्वर ४३८८३,दारणा १३१६०,भंडारदरा ९७७४,निळवंडे १३९९४,गंगापूर ६३३६,ओझरवेर ६९०५,होळकर ब्रिज ९८१०,कडवा ३६२० या धरणातून एवढ्या क्युसेक प्रमाणे पाणी सोडण्यात आले आहे.तसेच धरण जलफुगवटा क्षेत्रात सोमवारी चांगला पाऊस झाला आहे.

# सिरसगाव येथे आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडीचे उत्साहात आयोजन

तभा वृत्तसेवा

कन्नड.दि.०७ जुलै - तालुक्यातील सिरसगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक वारकरी वेशभूषेत भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीचे गावकऱ्यांनी व शालेय समितीने जल्लोषात स्वागत केले.

यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी व वारकरी यांच्या वेशभूषेत सहभागी होत भक्तिपर वातावरण निर्माण केले. दिंडीच्या माध्यमातून झाडे लावा, ग्रंथ दिंडी, वृक्ष दिंडी असे विविध उपक्रम राबवण्यात आले, जे पर्यावरण व ज्ञान संवर्धनाचा संदेश देणारे ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता येवले यांच्या मार्गदर्शनखाली, खलील पिंजारी, सुनील भामरे, अतुल अमृतकार, आमीर शेख, जयश्री बागड, श्रीमती उज्वला जगदाळे, पल्लवी जंगले, हिवाळे , अंगणवाडी सेविका, मदतनीस, तसेच गावचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## संजय वाघ यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ जूलै - तालुक्यातील बहुलखेडा येथील प्रगतिशील शेतकरी संजय लक्ष्मण वाघ(पाटील) (वय.५५) यांचे अल्पशा आजाराने दि.७ सोमवार रोजी मध्यरात्री २:०० वाजता निधन झाले.त्यांचेवर सकाळी १२ वा.बहुलखेडा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,एक मुलगी,नातवंडे असा परिवार आहे.

# अखेर नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची प्रतीक्षा संपली

## आजपासून ५०% रकमा थेट खात्यात वर्ग होणार - अवसायक

नगर : अवसायानात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांची प्रतिक्षा अखेर संपली असून प्रशासनाने यापूर्वी घोषित केल्याप्रमाणे पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५०% रक्कम थेट ठेवीदारांच्या खात्यात आज पासून वर्ग होणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. डी आय सी जी सी कार्यालयाकडून सदरचे ना हरकत प्रमाणपत्र बँक प्रशासनास प्राप्त झाल्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रक्कम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी अपडेट केलेल्या १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५०% इतकी रक्कम आज पासून शाखानिहाय संबंधित ठेवीदारांनी दिलेल्या बँक खात्यात आजपासून जमा करण्यात येणार आहेत.

# बालविवाह झालेल्या पीडितेचा सासरच्या मंडळीकडून छळ !

कन्नड: दि.०७ जुलै - तालुक्यातील सातकुंड येथील एका अल्पवयीन पीडितेचा (वय अंदाजे १६ वर्ष) दि. १७ मे २०२५ रोजी बालविवाह चाळीसगाव जि. जळगाव येथील एका सज्ञान पुरुषाशी झाला होता सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सासर च्या मंडळी कडून या पिडीतेला त्रास होत असल्याने ती माहेरी वडीलांकडे आली असून सध्या माहेरी राहत आहे. मात्र सासरी जाण्यासाठी तगादा लावून बालिकेचे वडील ही तिला मारहाण करत असल्याची तक्रार चाइल्ड हेल्पलाइन - १०९८ छत्रपती संभाजीनगर या कक्षास प्राप्त झाली, त्या अनुषंगाने बाल विकास प्रकल्प अधिकारी निलेश राठोड यांनी सातकुंड येथील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी एस. बी. पडोळे यांना शुक्रवार (दि. ५ जुलै) पत्र काढून सदरील पीडीत बालिकेची सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा तसेच दोषी आढळल्यास खात्री करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा असे पत्र दिले आहे. या प्रकरणात अद्याप पर्यत पोलिसांत गुन्हा दाखल झाला नाही, पीडिता अल्पवयीन असून तिचा बालविवाह झाला तरी त्याची माहिती प्रशासन नाही यावरून प्रशासन बालविवाह कायद्यासाठी किती गंभीर आहे याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

**CHANGE OF NAME** सोलापूर तरुण भारत प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

I HAVE CHANGING MY NAME
**FROM**
**OLD NAME :** TABBSUM JAWED SHAIKH
TO
**NEW NAME :** SHAIKH TABASSUM AASIF
AS PER MY DOCUMENTS
**ADDRESS :** MAKRANPUR TQ KANNAD DIST AURANGABAD (MAHARASHTRA) 431103

## जाहीर प्रगटण

**मा. डी.एस. तांबे मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : १६/०७/२०२५

दि.कि.अर्ज क्र. २३९/२०२५

अर्जदार : १. नंदाबाई भ्र. राजू जाधव, वयः ५४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. कृष्णा पि. राजू जाधव, वयः २४ वर्षे, धंदाः शेती, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. नैना भ्र. आकाश जगताप, वयः २६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. जहागीरदार वाडी, चाळीसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगाव. ४. रुपाली नवनाथ औताडे, वयः २६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. जवळी खु., ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे राजु कारभारी जाधव हे दि.१०/०५/२०१९ रोजी मौजे शिवराई, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत राजु कारभारी जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०३/०७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटण

**मा. आर.एस. तापडीया मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २०/०९/२०२५

दि.कि.अर्ज क्र. २७२/२०२५

अर्जदार : रंगनाथ रघुनाथ कुठेय्या, वयः ६५ वर्षे, धंदाः मजुरी, रा. उंम्बरखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदार : १) महाराष्ट्र शासन, व्दारा- जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद. २) आश्विनी भ्र. अर्जुन कुटैय्या, वयः २५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड, ह.मु. हिवरखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३) श्रध्दा पि. अर्जुन कुटैय्या, वयः ०४ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. हिवरखेडा, ता. कन्नड, अ.पा.क. गैरअर्जदार क्र. २ जन्मदाती आई.

अर्ज - लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा व गैरअर्जदार क्र. २ हिचे पती तसेच गैरअर्जदार क्र. ३ चे वडील नामे मयत अर्जुन रंगनाथ कुठेय्या हे दि. १३/०६/२०२४ रोजी मौजे पिशोर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत अर्जुन रंगनाथ कुठेय्या यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ ते ३ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०३/०७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटण

**मा. श्री. आर. एस. तापडीया सह दिवाणी न्यायाधीश साहेब कन्नड यांच्या न्यायालयतन.**

दि.की. अर्ज.क्र :- २३८/२०२५

पुढील तारीख :- ०४/०८/२०२५

अर्जदार - १) हौसाबाई भ्र. विठ्ठल शिरसे व्य: ६९ धंदा : मजुरी रा. माळीवडा कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. २) स्वाती श्र. रामेश्वर शिरसे वय : ३७ धंदा : मजुरी रा. माळीवडा कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. ३) आर्यन पिता रामेश्वर शिरसे वय : १३ धंदा : शिक्षण रा. माळीवडा कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. (अ.पा.कर्ता. अर्जदार क्र १) ४) आयुष पिता रामेश्वर शिरसे वय: १० धंदा शिक्षण रा. माळीवडा कन्नड ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर. (अ.पा. कर्ता. अर्जदार क्र १)

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी, जि.छ. संभाजीनग

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत,

वरील प्रकरणात अर्जदार क्र १ ते ४ तर्फे नम्र विनंती की,

अर्जदार क्र. २ ही मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ ही मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांची आई आहे. अर्जदार क्र ३ व ४ हे मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांचे मुले आहे. अर्जदार क्र. ३ व ४ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. १ ही त्यांची जन्मदेती आई आहे, तसेच मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांचे वडील व अर्जदार क्र. १ चे सासरे व अर्जदार क्र २ चे पती मयत विठ्ठल पिता आसाराम शिरसे हे देखील मयत झालेले आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ हेच मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ चा मुलगा व अर्जदार क्र ३ व ४ चे वडील मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे हे दि. ०३/०९/२०२४ रोजी सामान्य रुग्णालय छ.संभाजीनगर जि.छ. संभाजीनगर. येथे मरण पावले आहे. सोबत मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांचे मृत्यू प्रमाणपत्र सामान्य रुग्णालय छ. संभाजीनगर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दि. ३०/०९ / २०२४ रोजी दिले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच, अर्जदार क्र. १ चे सासरे व अर्जदार क्र २ चे पती व मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचे वडील व अर्जदार क्र. ३ व ४ चे आजोबा हे देखील मयत झालेले आहे. मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे हे अडाणी व अशिक्षित असल्यामुळे त्यांनी वडील यांची नोंद नगर परीषद कार्यालय कन्नड येथे केलेली नाही, त्यामुळे त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करू शकत नाही. अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे यांचा मृत्यू पश्चात सरकारी योजने चा लाभ मिळणे व अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या कार्यालयात दाखल करण्यासाठी साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पूर्तता केली आहे, मा. न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्या मुळे सदरील प्रकरण मा. न्यायालयात दाखल कारणे भाग पडले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ व मयत रामेश्वर पिता विठ्ठल शिरसे मौजे, रा. माळीवडा कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस असून वळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची मागणी करत असल्यामुळे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत आहे. सदरील अर्जास दि. १८/०१/२०२५ रोजी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे कारण घडले आहे. अर्जदारनी यापूर्वी आशा प्रकारच्या वारस प्रमाणपत्राची मागणी कुठल्याही न्यायालायत केलेली नाही, अथवा न्याय प्रविष्ट देखील केलेली नाही. त्या अर्थी सर्व जनतेस कळीविण्यात येते की, सदरील अर्जास कुणाचाही कुठल्याही प्रकारचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटण प्रसिद्धी पासून ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात लेखी स्वरूपाचा अथवा आपल्या वकील मार्फत आक्षेप नोंदवावा मुदतीत कुणाचा उजर आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्या बाबतचे आदेश प्रदान केले जाईल

दिः-२३/०६/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटण

**मा.श्री, व्ही. डी. पाटील सह दिवाणी न्यायाधीश साहेब कन्नड यांच्या न्यायालायतून.**

दि.की.अर्ज.क्र : २१६/२०२५

पुढील तारीख : ०८/०७/२०२५

अर्जदार - १) हौसाबाई भ्र. दादाराव राऊत वय: ७४ धंदा मजुरी रा. राममंदिर जवळ कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. २) कडुबा भ्र. दादाराव राऊत वय : ५७ धंदा मजुरी रा. राममंदिर जवळ कन्नड ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर ३) अनिल भ्र.दादाराव राऊत वय : ५१ धंदा : मजुरी रा.राममंदिर जवळ कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ४) सुनील भ्र. दादाराव राऊत वय: ५० धंदा : मजुरी रा.राममंदिर जवळ कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ५) मीना भ्र. अशोक जताडे वय ४० धंदा घरकाम रा. शेवगांव जि. अहमदनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी, जि.छ. संभाजीनग

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील प्रकरणात अर्जदार क्र १ ते ४ तर्फे नम्न विनंती की,

अर्जदार नं. १ ही मयत दादाराव पिता भावराव राऊत यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ५ ही अर्जदार क्र। व मयत दादाराव पिता भावराव राऊत यांची मुलगी आहे व अर्जदार क्र. २, ३, ४ हे अर्जदार क्र । व मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचे मुले आहे. अर्जदार २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहीण असून अर्जदार क्र. १ ही त्यांची जन्मदेती आई आहे, तसेच मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचे आई व वडील व अर्जदार क्र. । चे सासू व सासरे हे देखील मयत झालेले आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ५ हेच मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र.। चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ चे वडील मयत दादाराव पिता भावराव राऊत हे दि. ०७/०९/२०२० रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छ. संभाजीनगर जि.छ. संभाजीनगर. येथे मरण पावले आहे. सोबत मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छ. संभाजीनगर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दि. ३०/०९/२०२० रोजी दिले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच, अर्जदार क्र. १ चे सासू व सासरे व मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचे आई व वडील व अर्जदार क्र. २ ते ५ चे आजी व आजोबा हे देखील मयत झालेले आहे. * मयत दादाराव पिता भावराव राऊत हे अडाणी व अशिक्षित असल्यामुळे त्यांनी आई व वडील यांची नोंद नगर परीषद कार्यालय कन्नड येथे * केलेली नाही, त्यामुळे त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करू शकत नाही. अर्जदार क्र. १ ते ५ यांना मयत दादाराव पिता भावराव राऊत यांचा मृत्यू पश्चात सरकारी योजने चा लाभ मिळणे व अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या कार्यालयात दाखल करण्यासाठी साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पूर्तता केली आहे, मा. न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्या मुळे सदरील प्रकरण मा. न्यायालयात दाखल कारणे भाग पडले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ व मयत दादाराव पिता भावराव राऊत मौजे, रा. राममंदिर जवळ कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. मयतास अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस असून वळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची मागणी करत असल्यामुळे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत आहे. सदरील अर्जास दि. १८/०१/२०२५ रोजी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे कारण घडले आहे. अर्जदारनी यापूर्वी आशा प्रकारच्या वारस प्रमाणपत्राची मागणी कुठल्याही न्यायालायत केलेली नाही, अथवा न्याय प्रविष्ट देखील केलेली नाही. त्या अर्थी सर्व जनतेस कळीविण्यात येते की, सदरील अर्जास कुणाचाही कुठल्याही प्रकारचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटण प्रसिद्धी पासून ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात लेखी स्वरूपाचा अथवा आपल्या वकील मार्फत आक्षेप नोंदवावा मुदतीत कुणाचा उजर आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्या बाबतचे आदेश प्रदान केले जाईल

दिः-२३/०६/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटण

**मा.श्रीमती, आर.एस. तापडिया सह दिवाणी न्यायाधीश साहेब कन्नड यांच्यन्यायालायतून.**

दि.की.अर्ज.क्र: २५३/२०२५

पुढील तारीख:- ३०/०७/२०२५

अर्जदार १) मंदाकिनी भ्र. गोपाळराव मुळे वय: ७३ धंदा शेती रा. अंधानेर कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. २) किरण पिता. गोपाळराव मुळे वय : ५३ धंदा : मजुरी रा. अंधानेर कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाज ३) विकास पिता, गोपाळराव मुळे वय : ५६ धंदा : मजुरी रा. अंधानेर कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर. ४) मनीषा पिता अविनाश धुमाळे (मनीषा पिता गोपाळराव मुळे) वय: ४९ धंदा : मजुरी रा. वाळूज ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी, जि.छ. संभाजीनग

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील प्रकरणात अर्जदार क्र १ ते ४ तर्फे नम्र विनंती की,

अर्जदार नं. १ ही मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ४ ही अर्जदार क्र । व मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांची मुलगी आहे व अर्जदार क्र. २, ३ हे अर्जदार क्र १ व मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांचे मुले आहे. अर्जदार २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहीण असून अर्जदार क्र. । ही त्यांची जन्मदेती आई आहे, तसेच मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांचे आई व वडील व अर्जदार क्र. १ चे सासू व सासरे हे देखील मयत झालेले आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ हेच मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ चे वडील मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे हे दि. २५ / ०५ /२०२४ रोजी छ. संभाजीनगर येथे मरण पावले आहे. सोबत मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र महानगर पालिका छ. संभाजीनगर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दि. ०९/०१/२०२५ रोजी दिले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच, अर्जदार क्र. १ चे सासू व सासरे व मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांचे आई व वडील व अर्जदार क्र. २ ते ४ चे आजी व आजोबा हे देखील मयत झालेले आहे. मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे हे अडाणी व अशिक्षित असल्यामुळे त्यांनी आई व वडील यांची नोंद ग्रामपंचयात अंधानेर ता. कन्नड येथे केलेली हे की, अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे यांचा मृत्यू पश्चात सरकारी योजने चा लाभ मिळणे व अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या कार्यालयात दाखल करण्यासाठी साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पूर्तता केली आहे, मा. न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्या मुळे सदरील प्रकरण मा. न्यायालयात दाखल कारणे भाग पडले आहे. हे की, अर्जदार क्र. १ ते ४ व मयत गोपालराव पिता गोविंदराव मुळे मौजे, रा. अंधानेर कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस असून वळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची मागणी करत असल्यामुळे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत आहे. सदरील अर्जास दि. १८/०१/२०२५ रोजी अंधानेर कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे कारण घडले आहे. अर्जदारनी यापूर्वी आशा प्रकारच्या वारस प्रमाणपत्राची मागणी कुठल्याही न्यायालायत केलेली नाही, अथवा न्याय प्रविष्ट देखील केलेली नाही. त्या अर्थी सर्व जनतेस कळीविण्यात येते की, सदरील अर्जास कुणाचाही कुठल्याही प्रकारचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटण प्रसिद्धी पासून ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात लेखी स्वरूपाचा अथवा आपल्या वकील मार्फत आक्षेप नोंदवावा मुदतीत कुणाचा उजर आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्या बाबतचे आदेश प्रदान केले जाईल

दिः-२३/०६/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटण

**मा. आर.एस. तापडीया मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीखः ०२/०८/२०२५

दि.कि.अर्ज क्र. २९९/२०२५

अर्जदार : १) सुधाकर नामदेव म्हसुरे, वयः ५१ वर्षे, धंदाः शेती, रा. चिमनापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.२) बळीराम नामदेव म्हसुरे, वयः ४५ वर्षे, धंदाः शेती, रा. चिमनापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.३) आनंदा नामदेव म्हसुरे, (मयत) यांचे वारस- ३.१) कासाबाई भ्र. आनंदा म्हसुरे, वयः ४५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चिमनापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३.२) सोमीनाथ आनंदा म्हसुरे, वयः २५ वर्षे, धंदाः शेती, रा. जाधववाडी तलाव वाडी करंजखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद,३.३) प्रियंका मंगेश धगे, वयः २३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पुरणवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ह.मु. रा. जाधववाडी तलाव वाडी करंजखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ३.४) कोमल जगदीश पाटील, वयः २० वर्षे, धंदाः घरकाम, रा. करंजखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३.५) कृष्णा आनंदा म्हसुरे, वयः १८ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. जाधव वाडी तलाव वाडी करंजखेड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ४) सुशिलाबाई सुरेश वळवळे, वयः ४३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. करंजखेड (जा.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज - लिगल हेअरशिप सर्टिफिकेट वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ३.१ यांचे सासरे व अर्जदार क्र. ३.२ ते ३.५ यांचे आजोबा नामे नामदेव यादव म्हसुरे हे दि. ०८/०४/२०२० रोजी मौजे चिमनापुर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत नामदेव यादव म्हसुरे यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०३/०७/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क ४४७/२०२५

अर्जदार : १) सोमनाथ साहेबराव जेउघाले, वय. ३३ वर्षे, धंदा. मजुरी, रा. गांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) नवनाथ साहेबराव जेउघाले, वय. २७ वर्षे, धंदा. शेती, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) लताबाई साहेबराव जेउघाले, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, पुंजाराम धोडीराम जेउघाले हे मांजरी ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. ३०/१२/२००६ रोजी मांजरी ता. गंगापूर येथे मयत झाले असून त्यांच्यापुर्वी त्यांची पत्नी नामे सुभद्राबाई भ्र. पुंजाराम जेउघाले ही मयत झालेली असुन त्यांच्यानंतर त्यांचा एकमेव मुलगा नामे साहेबराव गुंजाराम जेउघाले हा दि. २०/०१/२०२१ रोजी मरण पावला असून त्यांच्यानंतर त्यांची अविवाहीत मुलगी नामे भामाबाई पि. पुंजाराम जेउघाले ही दि. ०४/०५/२०२५ रोजी मौजे मांजरी ता. गंगापूर येथे मरण पावल्या असून मयत पुंजाराम धोंडीबा जेउघाले यांची अर्जदार क. ३ ही सुन असून मयत साहेबराव पुंजाराम धोंडीबा यांची पत्नी आहे. अर्जदार क. १ व २ हे मयत साहेबराव पुंजाराम जेउघाले यांचे मुले आहे. मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत पुंजाराम धोंडीबा जेउघाले यांच्या नावे मांजरी ता. गंगापूर ग्रामपंचायत अंतर्गत स्थावर मिळकत जिचा सिटी सर्व्हे क. १४९ असून त्याचे क्षेत्रफळ ९४.५० चौ. मिटर आहे. अर्जदारांना सदरची मिळकत त्यांचे नावे नामतर करण्यासाठी सदर सिटी सर्व्हे कार्यालयात अर्जदारांना मयत पुंजाराम धोंडीबा जेउघाले, साहेबराव पुंजाराम जेउघाले व भामाबाई पुंजाराम जेउघाले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटण

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद (मा. पाटील मॉडम यांचे कोर्टात)**

Civil Misc. Application No. 453/2025

बाबुलाल पिता इब्राहिम शेख व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी रुबाबी इब्राहिम शेख यांचा दि.१०/०७/२०१४ रोजी मौजे सिंधी सिरसगाव, ता.गंगापुर जि.औरंगाबाद येथे वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला असुन इब्राहिम अब्दुल शेख यांचा पण मृत्यु ब-याच वर्षापुर्वी झालेला आहे. रुबाबी इब्राहिम शेख आणि इब्राहिम अब्दुल शेख पती - पत्नी होते व त्यांचे वारसांपैकी / मुलांपैकी मुलगा नामे युसुफ इब्राहिम शेख यांचा दि.१९/०२/२०२४ रोजी घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे वैद्यकीय उपचारादरम्यान मृत्यु झालेला आहे. अर्जदार नं. १. बाबुलाल पिता इब्राहिम शेख, रा. सिंधी सिरसगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद २. इनुस शेख पिता इब्राहिम शेख, रा. साजापुर, पोस्ट घाणेगाव, औरंगाबाद ३. शकीनाबी पिता इब्राहिम शेख, रा. सिंधी सिरसगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४. गवसिया भ्र. हमीद खान, रा.पठाण मोहल्ला, अंबड, जालना ५. हुमा भ्र.शेख युसुफ, रा.गदाना, ता. खुलताबाद जि.औरंगाबाद ६. अल्मास पिता शेख युसुफ, रा.गदाना, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद ७. आयमन पिता शेख युसुफ, रा.गदाना, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद ८. शमीना भ्र.युसूफ शेख, रा.शिवशंकर कॉलनी, तानाजी चौक, गारखेडा, औरंगाबाद ९. फैजान पिता इसुब शेख, रा.धावलपुरी, ता. जि. औरंगाबाद १०. शेख फरहान पिता युसुफ, रा. गांधेली, चिखलठाणा, औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते १० यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.०५/०७/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# बुडत्यांना एकीचा आधार...

गेल्या दोन दिवसांत, म्हणजे शनिवारी आणि कालच्या रविवारी, महाराष्ट्राने दोन महासोहळे अनुभवले. रविवारचा सोहळा दरवर्षी त्याच अमाप उत्साहाने साजरा होत आल्याने नेहमीप्रमाणे यंदाही तो अवघ्या महाराष्ट्राच्या संस्कृती आणि संवेदनांचा संपूर्ण सोहळा होता, तर शनिवारचा सोहळा, काही ठराविकांच्या भावनांनी एवढा काही ओथंबून गेला होता की, त्याच्या महापुरात वाहवत गेलेल्या काही वाहिन्यांच्या भाषेत सांगावयाचे झाले, तर वर्णनासाठी शब्द अपुरे पडतील. तसेही मराठी वाहिन्यांकडे मराठी शब्दांची नेहमी वानवाच असल्याने आणि शनिवारी तर त्यापैकी अनेकांचा भावनावेगही अनावर झालेला असल्याने अगोदरच अपुरा असलेला शब्दसंग्रह अधिकच तोकडा ठरावा हेही सहाजिकच होते. रविवारच्या आणि शनिवारच्या सोहळ्यातील एक फरक मात्र निश्चित होता. रविवारचा सोहळा, भिवरेच्या काठी अठ्ठावीस युगे भक्तांसाठी काया शिणवित उभा असलेल्या विठ्ठमाउलीच्या भक्तीचा सोहळा होता, तर शनिवारचा सोहळा म्हणजे, वीस वर्षांपूर्वी बडव्यांच्या गराड्यात सापडल्याने दूर झालेल्या भावंडांच्या पुनर्मिलनामुळे सुटकेचा सुस्कारा सोडणाऱ्या काही मोजक्यांच्या विठ्ठलाच्या मुक्तीचा सोहळा होता. युगायुगापासून वर्षानुवर्षे पंढरीच्या वाळवंटी लोटणाऱ्या अपार भक्तिसागराची तुलना कशाशीच होऊ शकत नाही, पण शनिवारी मुंबईतील वरळीच्या डोम नावाच्या सभागृहात लोटलेल्या मुक्तिसागराची वर्णने करताना काही मोजक्या मराठी वाहिन्यांना तुलनेसाठीही शब्द सापडेनासे झाले. हा आनंदातिरेक कशाचा, हे अनेकांस त्यावेळी सहज समजून येत होते, हा भाग वेगळा. पण त्यानिमित्ताने पंढरीच्या विठोबाप्रमाणे शनिवारच्या विठोबाचेही दर्शन वाहिन्यांच्या पडद्यावरून महाराष्ट्रास घडले. अठ्ठावीस युगे आषाढी-कार्तिकीच्या मुहूर्तावर आणि नंतरही सदैव भक्तांच्या दर्शनासाठी चंद्रभागेतीरी काया शिणवत कमरेवर हात घेऊन उभ्या असलेल्या पंढरीच्या विठोबासमोर रविवारी लाखो भाविक नतमस्तक झाले, तर जेमतेम वीस वर्षांपूर्वी, बडव्यांच्या गराड्यात सापडल्यामुळे काही भक्तांनी पाठ फिरविल्यावर पुन्हा त्यांच्या भेटीसाठी आसुसलेला, कमरेवर हात ठेवून उभा असलेला, हसतमुखाने चेहऱ्यावर मुक्तीचा आनंद उधळणारा दुसरा एक विठोबा त्याच जुन्या बडव्यांच्या गर्दीने पाहिला. माझा राग त्या विठोबावर नाही, त्याला ज्या बडव्यांनी घेरले आहे, त्यांच्यावर आहे, असे सांगत स्वाभिमानाने या भक्ताने वीस वर्षांपूर्वी आपल्या विठोबाकडे पाठ फिरविली होती. तेव्हापासून पुढे अनेक वर्षे तो विठोबा, तो भक्त आणि ते बडवे कडवटपणाने एकमेकांची उणीदुणी काढत राहिले. वीस वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले, वारेदेखील उलटसुलट फिरले, भक्ताला विठ्ठलाची आणि विठ्ठलास भक्ताची गरज जाणवू लागली आणि ज्या बडव्यांवरील रागापायी भक्ताने त्याच्या विठोबाला जय महाराष्ट्र केले होते, त्या बडव्यांनीच पुनर्भेटीचा सोहळा घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतल्यावर, भक्ताचे दर्शन घेण्यासाठी तळमळणारा एक विठोबा वरळीच्या गर्दीत कमरेवर हात घऊन उभा ठाकला. जणू वीस युगे लोटल्याचे भासविणाऱ्या वीस वर्षांच्या विरहातील चटके, टक्केटोणपे, चढउतार अनुभवल्यानंतरचा हाच मुक्तीचा सोहळा अनुभवण्यासाठी तळमळत असलेल्या बडव्यांच्या गर्दीत आनंदाचे डोही आनंद तरंग अशा भावनांचा सागर उचंबळून आला. आता हा विठोबा, त्याचा भक्त आणि विठोबाला घेरणारे त्याचे बडवे, सारेजण एकत्र आले आहेत. द्वैत-अद्वैताचा सारा भाव आता समाप्त झाला आहे आणि पुढे विठोबा, भक्त, बडवे सारे मिळून एकत्र वाटचाल करणार आहेत, अशा एका आशादायी भविष्याच्या भावनेने अनेकजण अक्षरशः भारावून गेले आहेत. गेल्या वीस वर्षांत राज ठाकरे किंवा उद्धव ठाकरे यांच्या पक्षांच्या यशापशाचा आलेख पाहावयास गेले, तर त्याची दिशा स्पष्टपणे उतरती राहिली हेच दिसते. अन्य राज्यांतील प्रादेशिक पक्षांच्या वाट्याला लाभली नव्हती, एवढी पुण्याई बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेच्या गाठीशी गोळा केली. मराठी माणसाने दिलेल्या अपार प्रेमाच्या बळावर राजकारण करणारा हा पक्ष, पुढे मात्र, सत्तेच्या राजकारणात भरकटतच गेला आणि एकामागून एक शकले उडत गेल्यावर बाळासाहेबांनाही अप्रिय असलेल्या काँग्रेससारख्या असंगांसोबत संग करून मुख्यमंत्रिपद मिळविण्याची कसरत उद्धव ठाकरेंना करावी लागली. बाळासाहेबांना किंवा त्यांच्यावर निष्ठा असलेल्या मराठी माणसाला ते मानवले नसतानाही उद्धव ठाकरे सत्तेची गणिते करतच राहिले आणि सातत्याने ती गणिते चुकत गेल्यावर पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा आता पुन्हा एकदा बेरजेचे गणित करणे त्यांना भाग पडले आहे. राज ठाकरे यांनी पक्ष सोडल्यावर, 'चिमण्यांनो परत फिरा' अशी हाक बाळासाहेबानी घातली होती, तेव्हा 'उडाले ते कावळे' अशा शब्दांत संभावना करत दुसरीकडून पक्षाबाहेर जाणाऱ्यांवर टीकाही सुरू झाली होती. पक्षाला लागलेल्या गळतीचे ते एक कारण होतेच. म्हणूनच संघटनेमधून पक्षामध्ये आणि पक्षामधून गटामध्ये रूपांतर झालेली उद्धव ठाकरेंची आजची शिवसेना व सत्तेची गणिते सातत्याने गमावलेले राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांना पुन्हा गळ्यात गळे घालण्याची वेळ आली व त्याच वेळी नेमके राज्य सरकारने त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी सक्तीचा मुद्दा ठाकरेंच्या गळ्यात घातला. महाराष्ट्राचे हित असे गोंडस नाव देत पक्षाचे व कुटुंबाचे वलय सांभाळण्याची नवी कसरत आता सुरू झाली आहे. ज्या विठ्ठलास बडव्यांनी घेरले आहे असे सांगत २० वर्षांपूर्वी राज ठाकरेंनी विठ्ठलाकडे पाठ फिरवली, त्याच विठ्ठलाची गळाभेट घेण्याकरिता त्यांना आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येचा योग साधणे भाग पडले आहे. एका बाजूला जनाधार गमावत चालल्याने व वजाबाकीच्या राजकारणामुळे विरोधी पक्ष जवळपास बेदखल होत चालले असून, वाढत्या जनाधारामुळे शक्तिशाली होत असलेल्या भाजपाला नामोहरम करणारी शक्ती आपल्याकडे नाही, याची जाणीवही त्यांना झाली आहे. त्यामुळेच भाजपावर कुरघोडी करण्यासाठी विरोधकांनी अगोदर महाविकास आघाडी नावाचा एक प्रयोग करून पाहिला होता. पण जनतेने नाकारल्याने या आघाडीचा फारसा टिकाव लागला नाही. आता बाळासाहेबांच्या पुण्याईची शिदोरी उघडण्याचा नवा प्रयोग म्हणून विरहमुक्तीकडे आशेने पाहणाऱ्या विरोधकांच्या गोटात शनिवारच्या सोहळ्यानंतर उत्साह संचारला आहे. जे काम आपल्याला साधणार नाही, त्यासाठीचा एक वेगळा प्रयोग म्हणून ठाकरे बंधूंच्या या विरहमुक्ती सोहळ्याकडे पाहिले जात आहे. इकडे ठाकरे बंधू मात्र त्याला महाराष्ट्राच्या हिताचा मुलामा चढवत असले तरी महापालिकांच्या आगामी निवडणुकीतील अस्तित्वाच्या लढाईत टिकाव धरण्याचा अखेरचा प्रयत्न आहे, हे महाराष्ट्रातील जनता जाणते. वीस वर्षांपूर्वी विस्कटलेले एक चित्र पुन्हा एकदा सांधले गेले आहे. आता आम्ही एकत्र आलो आहोत आणि एकत्र राहणार आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी शनिवारच्या मुक्तिसोहळ्यात जाहीर केले. त्यांची ती गरजच आहे. महाविकास आघाडीचा प्रयोग बारगळला आहे. आघाडीतील एकएक सहकारी पक्ष दुरावत चालला आहे. भाजपासोबतची साथ तर केव्हाच संपली असल्याने आता युतीचा कटोरा कोणासमोर घेऊन जाणार हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. दुसरीकडे निवडणुकांतील सततच्या अपयशामुळे पक्ष संपूर्ण संपण्याआधी एकमेकांच्या आधाराने उभे राहणे राज ठाकरे यांच्यासाठीही अपरिहार्य झाले आहे. एकमेकांना वाचविण्यासाठी वीस वर्षांच्या विरहानंतर का होईना, दोन भाऊ एकत्र आले ही चांगलीच बाब आहे. याच्याच आनंदातून आता बडव्यांच्या गराड्यातून विठ्ठलाची आरती सुरू होईल, तेव्हा नव्या भक्ताला त्यामध्ये आपला सूर मिसळावा लागेल. वीस वर्षांपूर्वीच विस्कटलेले हे सूर नव्या प्रयोगानंतर पुन्हा जुळतात का, ते पाहण्यासाठी राजकारणातले वारकरी उत्सुक झाले आहेत.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# आण्विक युद्धाचे चार बिंदू!

युक्रेनने रशियाचे ड्रोन कारखाने उद्ध्वस्त केल्यानंतर रशियाकडून युक्रेनच्या विरोधात अण्वस्त्रांचा वापर केला जाण्याची दाट शक्यता तयार झाली आहे. जगात आजवर आण्विक संघर्षाचे तीन बिंदू सांगितले जात होते. तायवान-चीन, इस्रायल-इराण आणि भारत-पाकिस्तान! अद्याप या देशांमध्ये प्रत्यक्ष आण्विक संघर्ष झडला नसला तरी पारंपरिक युद्धापेक्षा वेगळ्या प्रकारचे दोन संघर्ष जगाने नुकतेच अनुभवले. आण्विक संघर्ष झडण्याच्या शक्यतेत एक नवी भर पडली आहे, ती म्हणजे युक्रेन! रशिया-युक्रेन युद्ध ज्या दिशेने जात आहे त्यात आण्विक युद्धाची शक्यता गडद होत आहे.

**रशियाला तडाखे :** तीन-चार दिवसांत युक्रेनवर विजय मिळविता येईल असा अंदाज बांधणाऱ्या रशियाला मागील साडेतीन वर्षांत तरी युक्रेनला पराभूत करता आलेले नाही. उलट युक्रेनने रशियाला चांगले तडाखे दिले आहेत. चार तडाखे तर रशियाच्या चांगले लक्षात राहावेत असे आहेत. रशिया आणि क्रिमिया यांना जोडणारा समुद्रातून जाणारा पूल युक्रेनने निकामी केला. रशियाचे एक मोठे जहाज बुडविण्यात युक्रेनला यश मिळाले. युक्रेनने रशियाच्या विमानांचे मोठे नुकसान केले. रशियाच्या बड्या लष्करी अधिकाऱ्यांना युक्रेनने ठार केले. याने संतप्त होत राष्ट्रपती पुतिन यांनी युक्रेनवर हवाई हल्ले अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला प्रत्युत्तर देत युक्रेनने रशियाचे ड्रोन कारखाने उद्ध्वस्त केले..

**इस्रायल-इराणचा अणु कार्यक्रम :** इस्रायल विरोधात वापरण्यासाठी इराण मागील अनेक वर्षांपासून आण्विक कार्यक्रम राबवीत आहे. इराण अणुबॉम्ब बनविण्याच्या जवळ गेला की इस्रायलने त्याचा अणुप्रकल्प उद्ध्वस्त करण्याचे धोरण राबविले आहे. यात इराणी अणु प्रकल्पात विस्फोट घडवून आणण्यापासून इराणच्या अणु शास्त्रज्ञांना ठार करण्यापर्यंतचे सर्व मार्ग इस्रायलने अवलंबिले आहेत. कारण एकदा का इराण अण्वस्त्रसंपन्न झाला की आपले अस्तित्व धोक्यात येईल अशी रास्त भीती इस्रायलला वाटत आली आहे.

**युरेनियम बेपत्ता :** अणुबॉम्बमध्ये वापरले जाणारे इराणचे ४०० किलो युरेनियम बेपत्ता झाले असल्याचे मानले जाते. आता याबाबत उलससुलट दावे केले जात असले तरी इराण सध्या तरी अणुबॉम्ब तयार करण्याच्या स्थितीत राहिलेला नाही यावर मात्र तज्ज्ञ एकमत आहेत.

**१५-२० दिवसांत बॉम्ब? :** अणुबॉम्बसाठी लागणारे युरेनियम इराणजवळ असल्याचे काही तज्ज्ञांना वाटते. इराणजवळ आज असलेले युरेनियम पाहता तो १५ ते २० दिवसांत बॉम्ब तयार करू शकतो असे या तज्ज्ञांना वाटते. इराणने युरेनियम ९० टक्के शुद्ध करण्यात यश मिळविल्याचा दावा केला आहे. मात्र अनेक तज्ज्ञ या निष्कर्षाशी सहमत नाहीत.

**केवळ ६० टक्के? :** अणुबॉम्ब तयार करण्यासाठी शुद्ध युरेनियम सर्वांत महत्त्वाचा घटक मानला जातो, त्याची शुद्धता ९० टक्के असावी लागते. इराणजवळ असलेले युरेनियम ६० टक्के शुद्धतेचे असल्याचे त्यांना वाटते.

नैसर्गिकरीत्या सापडणाऱ्या खनिजात युरेनियम केवळ ०.७ टक्के म्हणजे एक टक्काही नसते. अणु वीज केंद्रात वापरले जाणारे युरेनियम ३ ते ४ टक्के शुद्ध असावे लागते तर अणुबॉम्बसाठी वापरले जाणारे युरेनियम ९० टक्के शुद्ध असावे लागते. इस्रायल इराणला ९० टक्क्यांच्या आसपास जाऊच देत नाही. इराण ६०-७० टक्क्यांपर्यंत पोहोचला की इस्रायल इराणला दणका देतो आणि इराणचा आण्विक कार्यक्रम काही महिन्यांसाठी-वर्षांसाठी मागे जातो. म्हणूनच इस्रायलने मागील काही वर्षांपासून सतत इराणच्या युरेनियम प्रकल्पांना लक्ष्य बनविले होते. आता यात अमेरिकाही सहभागी झाली आहे.

**पुन्हा एकदा युद्ध? :** अमेरिकेने इराणच्या तीन आण्विक केंद्रांवर हल्ले चढवून ते नष्ट केल्याचा दावा केला आहे. आवश्यकता पडल्यास पुन्हा अमेरिका इराणवर हल्ले चढवू शकतो असा संकेत राष्ट्रपती ट्रम्प यांनी अगोदरच दिला आहे. अमेरिकेने काही महिन्यांसाठी तरी इराणचा आण्विक कार्यक्रम मागे फिरविला असल्याचे मानले जाते. इराण आणि अमेरिकेचे हाडवैर पाहता अमेरिका नजीकच्या काळात पुन्हा एकदा इराणच्या विरोधात लष्करी कारवाई करू शकतो.

**आता फतवा जारी :** दरम्यान, इराणच्या धार्मिक नेत्यांनी राष्ट्रपती ट्रम्प व पंतप्रधान नेतान्याहू यांच्या विरोधात फतवा जारी केला आहे. याचा दुसरा अर्थ म्हणजे येणाऱ्या काळात इस्रायल-इराण यांच्यात झालेली युद्धबंदी फार टिकणारी नाही. इस्रायल-इराण यांच्यात आण्विक युद्ध टाळावयाचे असेल तर कोणत्याही परिस्थितीत इराणला आण्विक अण्वस्त्रे तयार करू देता कामा नये यावर अमेरिका व इस्रायल यांच्यात एकमत आहे.

**आणि भारत-पाकिस्तान :** भारत आणि पाकिस्तान यांच्यात आण्विक संघर्ष झडण्याची पूर्ण शक्यता असल्याचे जगात मागील काही वर्षांपासून मानले जात आहे. १९९८ मध्ये वाजपेयी सरकारने अणुचाचण्या केल्यानंतर काही दिवसांच्या आत पाकिस्तानने अणुचाचण्या केल्या. याचा अर्थ दोन्ही देशांनी अणुचाचण्यांची तयारी केली होती. मात्र तसा निर्णय घेण्याचे दोन्ही देश टाळत होते. पाकिस्तान काहुटा येथील अणु केंद्रात आपला अणुबॉम्ब विकसित करीत होता. भारताने त्याचवेळी इस्रायलप्रमाणे कारवाई करून पाकिस्तानची अणुचाचणी करण्याची क्षमता नष्ट करावयास हवी होती असे मानले जाते. भारत हे करू शकतो याची पाकिस्तानला कल्पना होती. यासाठी पाकिस्तानने रात्रंदिवस काहुटा अणु प्रकल्पाला हवाई सरंक्षण देण्याची व्यवस्था केली होती. त्यासाठी लढाऊ विमानांची तैनाती करण्यात आली होती.

**चोरीचा मामला :** पाकिस्तानचा आण्विक कार्यक्रम म्हणजे चक्क चोरीचा मामला होता असे नंतर उघडकीस आले. डॉ. खान नावाच्या एका संशोधकाने पाकिस्तानला आण्विक कार्यक्रम राबविण्यास मदत केली. आता पाकिस्तानजवळ भारताच्या बरोबरीत अण्वस्त्रे असल्याचे मानले जाते. इराणसारखा पाकिस्तानही एक माथेफिरू देश मानला जातो. फरक एकच आहे. इराण हा शिया मुस्लिमांचा आहे तर पाकिस्तान सुन्नी मुस्लिमांचा. माथेफिरूपणा करण्यात दोघेही सारखे आहेत. आता तर पाकिस्तानला चीनने उघड साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.

**चीनचा पाठिंबा :** चीनने पाकिस्तानची किती पाठराखण करावी? ३० जूनपर्यंत पाकिस्तानजवळ परकीय चलनाचा किमान अमुक अमुक साठा असावा अशी अट आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने या देशाला घातली होती. पाकिस्तानला ती स्वबळावर पूर्ण करणे शक्य नव्हते. पाकिस्तान आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या काळ्या यादीत जाऊ नये म्हणून चीनने ३० जून येण्यास दोन दिवस बाकी असताना पाकिस्तानला मोठा आर्थिक पुरवठा केला. चीनच्या या मदतीमुळे पाकिस्तान आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या अटीची पूर्तता करू शकला. चीन पाकिस्तानला किती आणि कशी मदत करीत आहे हे पुन्हा पुन्हा दिसून येत आहे.

**आणि चौथा बिंदू :** जगात आण्विक संघर्षाचा चौथा बिंदू म्हणजे तायवान. चीनला आज ना उद्या तायवानला गिळंकृत करावयाचे आहे. आणि याची अमेरिकेला जाणीव आहे. म्हणूनच अमेरिकेने तायवानला सारी मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. चीन-तायनान दोन्ही देशांनी युद्धाची तयारी सुरू केली असल्यासारखे दिसते. युक्रेन युद्धापासून बोध घेत तायवानाने आपल्या देशात ड्रोन बनविण्याचा निर्णय घेतला आहे. तसे तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने तायवानने हालचाली सुरू केल्या आहेत.

## वेध

सोनाली ठेंगडी

# गाव वसलेच नाही अन्...!

हिंदीत एक प्रसिद्ध म्हण आहे ...'गांव बसा नहीं और लुटेरे आ गये'... याचे आपण आपल्या पद्धतीने मराठीकरण करूया की, गाव वसलेच नाही आणि भामटे पहिलेच हजर! हा प्रकार घडलाय् जनगणना मोहिमेबाबत.

केंद्र सरकारने जनगणनेची अधिकृत अधिसूचना जारी करून उणेपुरे ३० दिवसही झाले नसतील. पण, या बातमीने प्रशासकीय यंत्रणा कितपत कामाला लागली, हे त्यांचे त्यांनाच माहिती... भामटे मात्र लगेच कामाला भिडले. आता जनगणना होणार आहे आणि त्यासाठी सरकारी लोक घरी येतील, तुमची सर्व माहिती विचारतील, तुम्हाला खरी खरी माहिती द्यावी लागेल, वगैरे बातम्या लोकांपर्यंत पोहोचल्या. प्रत्यक्षात ही प्रक्रिया २०२७ मध्ये होणार आहे. २०२७ मध्ये जनगणना होईल आणि ती दोन टप्प्यांत केली जाणार आहे. यासाठी प्रत्येक स्तरावरील लोकांकडून माहिती घेतली जाईल. जणगणनेची प्रक्रिया मोबाईल ॲप्लिकेशन्स वापरून डिजिटल माध्यमातून केली जाणार आहे. घरोघरी जाऊन जनगणना करण्यासाठी ३४ लाख सर्वेक्षक आणि पर्यवेक्षक तैनात केले जातील, जे ग्राऊंड लेव्हलला सर्व माहिती गोळा करतील. याशिवाय १.३ लाख जनगणना अधिकारी तैनात केले जातील. हे सर्व कर्मचारी जनगणनेसाठी फील्डवरील सर्वेक्षणाचे काम करतील आणि त्याची संपूर्ण माहिती एकत्र करतील. जनगणनेत जात देखील विचारली जाईल. जनगणना डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे, यासाठी ती मोबाईल ॲप्लिकेशन वापरून डिजिटल माध्यमातून केली जाईल.



हे सर्व मुद्दे स्पष्ट केल्यानंतर देशात जनगणना होणार, एवढी माहिती लोकांना समजली. कदाचित बहुतांश लोक आता रोजच्या कामात हा मुद्दा विसरलेही असतील. काही भामट्यांनी मात्र जनगणनेच्या बातमीचे भांडवल करीत आपले सावज हेरण्यास सुरुवात केली. त्यांनी लोकांच्या घरी जाऊन, आम्ही जनगणनेसाठी आलोय, असे सांगितले. त्यात सर्व वैयक्तिक माहिती विचारून अगदी सिमकार्डचा पिनदेखील मागितला. तुमचा ओटीपी सांगावा लागेल, असे सांगून काही भोळ्याभाबड्या (?) लोकांना लाखो रुपयांचा चुना लावला. विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या काही घटना उघडकीस आल्या आहेत. आता डिजिटल फ्रॉड, ऑनलाईन फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असताना फसवणुकीचा नवा फंडा भामट्यांनी आणला आहे. जनगणना अधिकारी आहे म्हटल्यावर माहिती द्यावीच लागणार, एवढेच सर्वसामान्यांना माहिती आहे. प्रत्यक्षात हे काम सुरू होण्यास अजून अवकाश आहे, याची त्यांना कल्पना नाही. किंबहुना, काही साधे-सरळ लोक सरकारी काम म्हटले की, अगदी काटेकोरपणे त्याचे पालन करतात. त्यात कुठेही कसूर राहायला नको, असा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांच्या प्रामाणिकपणाचा गैरफायदा काही भामटे घेत असतात.

यात पहिली आणि महत्त्वाची बाब म्हणजे, घरी येणारे किंवा फोनवरून सांगणारे असे म्हणत असतील की, आम्ही जनगणनेसाठी आलोय् तर ते आता येणार नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. पुढील वर्षानंतर ही प्रक्रिया सुरू होईल. तोवर कोणी हा प्रकार करीत असेल, तर त्याला प्रथम ओळखपत्र मागितले पाहिजे. आता यावर लोक म्हणतील की, नकली ओळखपत्र बनवणे फारसे कठीण नाही. हेही खरे आहे. म्हणून त्या व्यक्तीचे नाव, फोन नंबर घेतले पाहिजे. त्याने आपल्याला खोदून खोदून माहिती विचारण्याआधी आपण त्याची माहिती जाणून घेतली पाहिजे. अजून जनगणना सुरूच झालेली नसताना, हे आले कुठून, असा प्रश्न आपल्याला पडायला हवा. एरवी अमिताभ बच्चन दररोज आपल्या फोनवर घसा खरडून सांगतो की, कोणातीही बँक तुम्हाला ओटीपी मागत नाही, पिन मागत नाही. तरीही लोक अशा बनावटगिरीत लाखो रुपये गमावताहेत्. आता या भामटेगिरीत जनगणनेच्या बनावट प्रकरणाची भर पडली आहे. आमच्या बाबतीत गुन्हा घडला म्हणून पोलिस आणि प्रशासनाला दोष देत बसण्यापेक्षा नागरिकांनीही जरा डोळसपणे वावरायला शिकले पाहिजे. प्रत्येकाला आपला पैसा प्रिय असतोच. बरेचदा आपल्या आसपासच्या लोकांना गरज असतानाही आपण तो देत नाही. मग कोणीतरी अपरिचित आपल्याला ओटीपी मागतो तर आपण निमूटपणे कसा देऊन टाकतो, हा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. म्हणून यापुढे सरकारकडून अधिकृतपणे जनगणनेची प्रक्रिया सुरू झाल्याचे जाहीर होत नाही, तोवर आपल्याकडे येणारा कोणीही जनगणना अधिकारी असल्याचे सांगत असेल तर अजिबात विश्वास ठेवू नये, अशांना घरात घेण्याचीही गरज नाही. किमान एवढी खबरदारी घेण्याची अपेक्षा तरी सुशिक्षितांकडून करता येईल.

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# गुरू वंद्य महान

गुरू-शिष्य परंपरा ही आपल्या देशातील प्राचीन परंपरा आहे. आषाढ पौर्णिमेला गुरुपौर्णिमा सर्वत्र साजरी केली जाते. संस्कृतमध्ये गुरू शब्दाचा अर्थ मोठा असा होतो. समोरच्याला श्रेष्ठत्व प्रदान करणारी आमची संस्कृती आहे. अंधारातून प्रकाशाकडे नेणारा जो आहे त्याला आम्ही गुरू म्हणतो. अंधकार म्हणजे एक परिस्थिती आहे. ज्यामध्ये व्यक्तीला काय करावे आणि काय करू नये हे कळत नाही. अंधकार हा व्यक्तीच्या जीवनामध्ये असू शकतो, समाजाच्या जीवनामध्ये असू शकतो, राष्ट्राच्याही जीवनामध्ये असू शकतो. महाभारतामध्ये कुरुक्षेत्राच्या रणक्षेत्रावर कौरव आणि पांडव यांचे सैन्य उभे होते. तेथे रणांगणावर उभ्या असलेल्या अर्जुनाला युद्ध करावे की करू नये असा प्रश्न निर्माण झाला. कारण ज्यांच्याशी युद्ध करायचे ते सर्व अर्जुनाचे आप्तस्वकीय होते. अशा आप्तस्वकीयांना मारून पृथ्वीचे राज्य मिळाले तरी काय कामाचे अशा पद्धतीचा विषाद त्याच्या मनामध्ये निर्माण झाला. त्यावेळेस भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले की, ''अर्जुना, तू युद्धामध्ये मारला गेला तर वीरगतीला प्राप्त होशील व जिंकला तर तुला संपूर्ण पृथ्वीचे राज्य मिळेल. त्यामुळे तू युद्धासाठी कृतनिश्चय हो.'' अर्जुनाला अशा पद्धतीने आपल्या कर्तव्याचे स्मरण करून देणारे भगवान श्रीकृष्ण हे अर्जुनाचे गुरू होते.

ही अंधकाराची परिस्थिती व्यक्तीच्या जीवनामध्ये सुद्धा निर्माण होते. कोणती नोकरी स्वीकारावी, कोणत्या जागी बदली घ्यावी, कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा, घरामध्ये सुरू असलेले भांडणतंटे यामध्ये कोणाची बाजू घ्यावी अशी वेगवेगळ्या पद्धतीची अंधकाराची परिस्थिती व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होते. एकेकाळी समाजाच्या समोर सुद्धा इस्लामी आक्रमणानंतर जे बाटवले गेलेले आहेत, धर्मांतरित झालेले आहेत त्यांना हिंदू धर्मात परत कसे घ्यावे अशा पद्धतीच्या समस्या, प्रश्न समाजाच्या समोर होते. ही सर्व परिस्थिती म्हणजे अंधकाराचीच परिस्थिती होती. त्या परिस्थितीमध्ये जो मार्गदर्शन करतो तो गुरू आहे. आठव्या शतकामध्ये देवल ऋषींनी देवल स्मृती लिहिली व समाजामध्ये ठिकठिकाणी अशा धर्मांतरित झालेल्या लोकांना पुन्हा स्वधर्मात आणण्यासाठी त्यांनी शुद्धीकरणाचा विधी लिहिला. अशाप्रकारे समाजाला मार्गदर्शन करणारे देवल ऋषी हे सुद्धा गुरूच आहे.

आपल्या समाजामध्ये अनेकानेक प्रकारचे धर्मपंथ संप्रदाय आहेत. त्यांना मार्गदर्शन करणारे अनेकानेक गुरू सुद्धा आहेत. त्यांना मानणारा शिष्यवर्गही आहे. आपल्या गुरूची प्रतिष्ठा वाढावी, त्याच्याकडे अधिकाधिक संख्येने लोकांनी यावे, त्यांचे मार्गदर्शन घ्यावे अशा पद्धतीची अपेक्षा शिष्यांची असते. शिखांनी तर गुरु ग्रंथ साहिब या ग्रंथाला आपला गुरू मानलेले आहे. म्हणजे ग्रंथच त्यांचे आता मार्गदर्शन करेल. समर्थ रामदास स्वामींनी सुद्धा माझ्यानंतर दासबोध हा ग्रंथ तुम्हाला मार्गदर्शन करेल असे सांगितले होते.

आपल्या देशात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेचे नाव खूप मोठे आहे. देशाच्या, समाजाच्या संकटप्रसंगी संघ नेहमीच उभा राहतो असा लोकांचा अनुभव आहे. या संघामध्येही गुरुपूजन असते. विशेष म्हणजे संघामध्ये कोणा व्यक्तीला गुरुस्थानी ठेवलेले नाही तर भगव्या ध्वजाला गुरुस्थानी ठेवलेले आहे. नवीन व्यक्तीला याचे पण आश्चर्य वाटू शकते. परंतु भगव्या ध्वजाला गुरुस्थानी ठेवून कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांची संख्या आज कोटीच्या घरात आहे. भगवा ध्वज हा त्यागाचा प्रतीक आहे. त्यागाच्या प्रतीकाची पूजा करणारे, आपल्या जीवनामध्ये सुद्धा त्यागाचे आचरण करीत असतात. त्यामुळे संघाचे काम करणाऱ्या शिक्षकांच्या जीवनामध्ये नेहमीच त्यागी वृत्ती दिसून येते. त्यांचे हे आचरण, त्यांचा स्वभाव समाजासाठी देशासाठी निश्चितच लाभप्रद आहे.

डॉ. हेडगेवारांनी संघाची स्थापना केली त्यानंतर काही दिवसांनी डॉक्टरांनी स्वयंसेवकांना विचारले की, आपल्या संघामध्ये गुरू कोणाला करायला पाहिजे? त्यावेळेला स्वयंसेवकांनी उत्तर दिले की, डॉक्टर साहेब, आपण संघाची स्थापना केलेली आहे त्यामुळे आपणच गुरू व्हायला पाहिजे. पण डॉक्टरांनी सांगितले की, आपल्याला संपूर्ण हिंदू समाजाचे संघटन करायचे आहे. हिंदू समाजाचे आयुष्य हे शेकडो वर्षांचे, हजारो वर्षांचे आहे. त्यामुळे इतकी वर्षे संपूर्ण समाजाला मार्गदर्शन करण्याची क्षमता एखाद्या व्यक्तीमध्ये क्वचितच असू शकते. कारण व्यक्तीला आयुष्याची मर्यादा आहे. व्यक्ती म्हटली की तिच्यात गुण-दोष आले. कोणाला कोणते गुण आवडतील, कोणाला कोणते दोष आवडणार नाहीत. त्यामुळे सुद्धा काही लोक एखाद्या व्यक्तीला मानणार नाही. त्यामुळे डॉक्टर हेडगेवार स्वयंसेवकांना म्हणाले की, शेकडो वर्षपर्यंत समाजाला प्रेरणा देण्याची क्षमता एखाद्या व्यक्तीपेक्षा एखाद्या प्रतीकामध्ये असू शकते. आणि म्हणून त्यांनी भगव्या ध्वजाला आपल्या गुरुस्थानी ठेवलेले आहे. जो ध्वज पाहिल्यावर आम्हाला आमच्या देशाचा इतिहास आठवतो, आमची परंपरा आठवते, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, गुरुगोविंद सिंह आठवतात, जो ध्वज पाहिल्यावर आम्हाला आमचे साहित्यकार, नाटककार, ऋषिमुनी आठवतात तो भगवा ध्वज संघाने आपल्या गुरुस्थानी ठेवलेला आहे. स्वयंसेवक या ध्वजासमोर उभे राहून भारत मातेची प्रार्थना म्हणतात व त्यातून प्रेरणा ग्रहण करतात. करोडो लोकांचा वनवासी समाज हा राष्ट्रीय प्रवाहापासून दूर होता. शिक्षण, आरोग्य या सुविधांपासून दूर होता. अशा समाजाला राष्ट्राच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी वनवासी कल्याण आश्रम असेल, धार्मिक क्षेत्रांमध्ये विश्व हिंदू परिषद असेल, विद्यार्थी क्षेत्रांमध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व मजदूर क्षेत्रामध्ये भारतीय मजदूर संघ अशा विविध संघटनांच्या माध्यमातून संघाचे स्वयंसेवक समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये जिथे जिथे उणीव असेल ती भरून काढण्यासाठी कार्य करीत आहेत.

संघाची १०० वर्षे ही केवळ एखाद्या स्वयंसेवी संघटनेची १०० वर्षे नाहीत तर ती राष्ट्रसाधनेची १०० वर्षे आहेत. भारत मातेच्या आराधनेची १०० वर्षे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंहासन जसे हजारो सैनिकांच्या बलिदानावर उभे होते तसे संघ हा हजारो स्वयंसेवकांनी आपल्या जीवनामध्ये संघकार्याला प्राथमिकता देऊन ते राष्ट्रकार्य मानून एका व्रतस्थ पद्धतीने आपले संपूर्ण जीवन व्यतीत केलेले आहे. त्यामुळे संघाची इमारत ही गेली शंभर वर्षे अशा कणकण राष्ट्रासाठी आजन्म झिजलेल्या त्यागी स्वयंसेवकांच्या त्यागावर उभी आहे.

समाजाच्या समोर जो अंधकार आहे त्यामध्ये प्रकाशाचा मार्ग शोधणे, समाजाला आपल्या सोबत घेऊन जाणे हे कार्य संघाचे स्वयंसेवक करीत आहेत. ही प्रेरणा त्यांनी आपल्या गुरूकडून म्हणजे भगव्या ध्वजाकडूनच ग्रहण केलेली असते. प्रत्येक देवतेची आपली पूजा पद्धती असते. भगवा ध्वज हा त्यागाचा ध्वज आहे. याची परंपरा ही त्यागाची परंपरा आहे. आपल्या व्यक्तिगत जीवनातल्या आवडीनिवडी, आलस्य यांचा त्याग करून सामाजिक कार्यासाठी आपले मन बनविणे, आपला वेळ देणे, आपले धन खर्ची घालणे हेच खरे गुरुपूजन आहे.

गुरु वंद्य महान, भगवा एकची जीवनप्राण, अर्पित कोटी कोटी प्रणाम. गुरु वंद्य महान.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे



### गाढवांमुळे अपघात होण्याची शक्यता

सोलापूर शहरात पाळीव प्राणी गाढवांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर सध्या दिसत आहे. ही चांगली गोष्ट आहे, पण गाढव मालक गाढवांना

गाढवांना कितीही हॉर्न वाजवले तरी ते बाजूला सरकत नाहीत .रस्त्यावर असलेल्या दुभाजकामधील झाडे गाढव खाताना सर्रास दिसतात. यापूर्वी कुत्रे व काढवांन मुळे अपघात झालेले बऱ्याचदा आपण बातम्या वाचलेल्या आहेत .या गोष्टीकडे वेळेवर लक्ष दिल्यास होणारे अपघात टाळता येतील. कृपया गाढव मालकांनी या गोष्टीवर वेळेवरच लक्ष द्यावे.

**- फैय्याज शेख, सोलापूर**


### शालार्थ घोटाळा ; शिक्षणव्यवस्थाच संकटात

शासकीय अनुदानित शाळांमधील शालार्थ वेतन घोटाळा आता गंभीर वळणावर असून, नागपूरच्या पुढे तो महाराष्ट्रभर पसरला आहे. विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) हे प्रकरण सोपविण्यात आले असून, आतापर्यंत २,७०० हून अधिक

आहे. विधिमंडळात आमदारांनी उपस्थित केलेल्या चौकशीला गती मिळाली आहे. हे प्रकरण शिक्षण व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण ठप्प होण्याची शक्यता आहे. तसेच संपूर्ण यंत्रणेवर अविश्वास व प्रामाणिक शिक्षकांवर अन्याय हे धोके देखील निर्माण होऊ शकतात. त्यामुळे जिथे बनावट कागदपत्रे, अस्तित्वात नसलेले शिक्षक वा एकाच शिक्षकाचे अनेक ठिकाणी वेतन असे प्रकार दिसून येतील, तेथे तातडीने कठोर कारवाई करावी. प्रशासकीय चुकांवर मात्र न्याय्य व विवेकी निर्णय अपेक्षित आहे. या प्रकरणी दोषींना शिक्षा झालीच पाहिजे, पण प्रामाणिक शिक्षक बळी पडू नयेत. शिक्षण व शिक्षक दोघांच्याही भवितव्याचा विचार करूनच प्रशासनाने जबाबदारीने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा आहे.

**अरुण सोपानराव कराळे**/१०१६३२६२७२

### कपाळावर बुक्का का लावतात?



बुक्का हा रंगाने काळा परंतु भक्तीचे प्रतीक मानला जातो. वारकरी संप्रदायातील प्रत्येक व्यक्तीच्या कपाळावर बुक्का (अर्थात त्याला अबीर असेही म्हटले जाते) दिसतो. घरोघरी होणाऱ्या श्रीसत्यनारायणाच्या पूजेत तिसऱ्या अध्यायाच्या समाप्तीनंतर कपाळावर बुक्का लावण्याची पद्धत आहे. कीर्तनकार निरूपणानंतर सर्वांना बुक्का लावतात. घरातील दारिद्र्य निघून जाते हीच त्यामागची भूमिका आहे. घराला, व्यक्तीला कोणाची लागलेली दृष्ट निघून जाते. लहान बाळांना सुद्धा तीट लावतात. स्त्रियांच्या सौंदर्याला कोणाचीही नजर लागू नये म्हणून डोळ्यात अंजन (काजळ) घालतात. हे सर्व बुक्क्याचे विविध प्रकार आहेत. तिरुपतीच्या देवळात श्रीनाथशास्त्री विष्णू सहस्रनामाचे नित्यनेमाने पठण

कुटुंबाकरिता काहीच करू शकत नाही ही त्यांना खंत होती. अर्थात त्यांचा परिवार असेल त्यात समाधानी होता. एका दिवाळीच्या दिवशी मंदिरात सकाळपासून संध्याकाळपर्यंत विष्णू सहस्रनामाचे पारायण करीत बसले आणि आणि डोळ्यातून अश्रू गळू लागले. पोथीवरच्या दयाघना शब्दावर अश्रू पडले. ते त्यांनी एका कोळशाच्या तुकड्याने पुसण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी तिरुपती भगवंताची कृपा होऊन प्रत्यक्ष परमेश्वर बाराबंदी घातलेला काठेवाडीच्या रूपात सर्व धन, धान्य त्यांच्या घरी देऊन गेले आणि त्यांच्या पत्नीला त्याने सांगितले की, माझ्या कपाळावरचा काळा बुक्का पुसून टाका. याचाच अर्थ भगवंताला दूषण न लावता फक्त श्रद्धेने त्याला नामातून, गजरातून, अभंगातून, गीतातून हाक मारा. तो फक्त भक्तीचा भुकेला आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विजय पवार विरोधात दुसरा गुन्हा दाखल



## विद्यार्थीनीचे लैंगिक शोषण प्रकरण

तभा वृत्तसेवा
बीड दि.७ जुलै

शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ करणाऱ्या विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल असून, सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यानंतर आता पुन्हा एक लैंगिक छळाची तक्रार समोर आली. त्यानुसार विजय पवार याच्याविरुद्ध बाल लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम व ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवाजी नगर पोलिस ठाण्यात एका १४ वर्षीय मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०२२-२३ मध्ये पीडित मुलगी व तिची बहीण बीड शहरातील विजय पवार संचालक असलेल्या एका शाळेमध्ये शिकत होत्या. २०२२ मध्ये दिवाळीच्या परीक्षेचे हॉलतिकीट मिळाले नसल्याने मुलगी प्रिंसिपलकडे गेली तेव्हा पालकांना घेऊन येण्यास सांगितले. त्यानंतर मुलीच्या वडिलांनी शाळेत प्रिंसिपलची भेट घेतली. तरीही पीडित मुलीस शाळेच्या वर्गात बसू दिले जात नव्हते. त्यामुळे पीडित मुलीच्या वडिलांनी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना या शाळेत नेऊन विजय पवार यांना बोलले होते. त्यानंतरही त्या मुलीस शाळेत बसू दिले गेले नाही. त्यानंतर पीडितेचे आजोबा शाळेत गेले. आता तुझा जावई माझ्याविरोधात तक्रार करतो, म्हणून त्याच्या मुलीस मी माझ्या शाळेत शिकू देणार नाही, तुला काय करायचे ते कर, त्याला मी समर्थ आहे, असे म्हणत दोन्ही मुलींना शाळेत येऊ दिले नसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.





**शंकर देशमुख यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव**

भाजपाचे कर्तव्यदक्ष जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचा वाढदिवस जिल्हाभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# सावरकर महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा

तभा वृत्तसेवा
बीड दि.७ जुलै



आषाढी एकादशीच्या निमित्ताने सावरकर महाविद्यालयामध्ये 'पंढरीचा पांडुरंग' या विषयावर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला शालेय महाविद्यालयीन व खुल्या गटातून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व गटातील स्पर्धकांनी पंढरीच्या विठुरायाचे मनमोहक रूप रांगोळीतून साकार केले. या स्पर्धेचा शुभारंभ प्रसिद्ध डॉ. सुनीता बारकुल, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी यांची उपस्थिती होती. डॉ. सुनीता बारकुल यांच्या उपस्थितीमध्ये यशस्वी स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या स्पर्धेत खुला गट १. सौ. रेणुका सचिन मस्के २. पवार शिवांजली बलभीम आणि रसिका बाहेती लोया ३. नीता अमोल नागले उत्तेजनार्थ दिपाली मन्मथ खडके, संगीता दामोदर सपकाळ, सौ. शितल प्रसाद पांडे, महाविद्यालय गट १. अक्षरा गजानन साळुंके आणि गर्गे नंदिनी नारायण २. वारभुवन सायली अनिल ,रेंगे स्वप्नाली बाळासाहेब ३. भालेकर साक्षी साईनाथ, कापसे आरती दीपक, ओंकार सचिन मस्के उत्तेजनार्थ - आगळे विशाखा विकास, साळुंके दिव्या दत्ता, गरुड वैभवी उमाकांत, कापसे स्नेहा दीपक, शालेय गट- १. आदित्य शंकर चव्हाण २. गोरे श्रावणी संतोष, डोंगरे श्रावणी विलास, महामुनी कार्तिकी अनंत ३. लांडगे सिद्धी गणेश आणि मस्के कार्तिक सचिन उत्तेजनार्थ गोरे सानवी संतोष, शिंदे प्राची राजेश, कारगुडे वेदांगी विजय, वाघमारे जान्हवी नारायण. रांगोळी स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. भावना देव, प्रा. अनंत देशपांडे, डॉ. सुनिता कुरुडे , प्रा. आनंद रत्नपारखी, डॉ. जोगेंद्र गायकवाड, सौ. सुचिता कुलकर्णी, प्रा. दीपा देशपांडे यांनी काम केले. तसेच डॉ. स्वाती कुलकर्णी, श्री. रोहन काकडे व प्रा.आसावरी राऊत यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला बीड शहरातील चंपावती, संस्कार, शिवाजी, भगवान,श्री श्री रविशंकर, सावरकर विद्यालया तील विद्यार्थी पालक यांची उपस्थिती होती.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तीन अर्ज प्राप्त

तभा वृत्तसेवा
बीड दि.७ जुलै

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये ०३ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.उपजिल्हाधिकारी यांच्याकडे लघु पाटबंधारे विभागाशी संबधित एक अर्ज, जिल्हा अधिक्षक विभागाशी संबधित एक अर्ज आणि जिल्हा भूमीलेख विभागाशी संबधित एक अर्ज असे एकूण तीन तक्रार अर्ज जिल्हा लोकशही दिनात प्राप्त झाले असून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# कैवल्य गोंदीकर सीए परीक्षा उत्तीर्ण

तभा वृत्तसेवा
बीड दि.७ जुलै



येथील राहिवासी तथा सुभाष रोडवरील श्री दत्त मंदिराचे अर्चक हेंमत मुळे (गोंदीकर) यांचे चिरंजीव कैवल्य मुळे (गोंदीकर) यांनी नुकत्याच झालेल्या चार्टर्ड अकाऊंटच्या फायनल परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

कैवल्य मुळे (गोंदीकर) यांचे इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण शहरातील संस्कार विद्यालयात पुर्ण झाले. त्यानंतर त्यांनी इयत्ता अकरावी, बारावी व नंतर बी.कॉमचे शिक्षण मॉर्डन कॉलेज पुणे येथे पुर्ण केले. भारतातील अत्यंत कठीण मानल्या जाणार्या चार्टर्ड अकाऊंट परीक्षा फांऊडेशन, इंटर मेडियट आणि फायनल या तीन टप्प्यांत घेण्यात येते.हे शिक्षण पुर्ण करण्यासाठी पाच वर्ष लागतात. या तीनही टप्प्यातील परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर आर्थिक नोंदी ठेवणे, आर्थिक विवरणपत्रे तयार करणे आणि त्यांचे परीक्षण करणे यासंबंधी अधिकार प्राप्त होतात.

इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाद्वारे घेण्यात येणार्या या महत्त्वाच्या परीक्षेमध्ये बीड शहरातील राहिवासी श्री दत्त मंदिराचे अर्चक व पूर्णवादी नागरी सहकारी बँकेचे पिग्मी एजंट हेंमत मुळे (गोंदीकर) यांचे चिरंजीव कैवल्य हेमंत मुळे (गोंदीकर)यांनी यश संपादन केले आहे.

# विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षे विषयी शिक्षण विभागाने घालून दिलेल्या निर्देशांचे पालन होते का?

## याबाबत सर्व शाळांची शिक्षण विभागा मार्फत चौकशी करण्यात यावी - सेवकराम जाधव

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.७ जुलै

बीड येथे ट्युशन क्लासेस मध्ये विद्यार्थिनी सोबत घडलेल्या विकृत घटणेमुळे संबंध महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रास मोठा धक्का बसला असून त्याकारणाने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निश्चितच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भवितव्य म्हणत असताना तेच जर सुरक्षीत नसतील तर देशाचे भविष्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

तथापि विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षेच्या बाबतीत शाळा आणि शिकवणी क्लासेसच्या ठिकाणी येणारे संभाव्य धोके टाळण्याकरीता सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव व पत्रकार केशव मुंडे यांच्या वतीने परळी येथील गटशिक्षणाधिकारी श्री एस.एम.कनाके यांना निवेदन देण्यात आले आहे.



यामध्ये प्रामुख्याने परळी तालुक्यातील शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या सर्व सरकारी व खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करता प्रत्येक शाळेत पिण्याचे शुद्ध पाणी व शौचालय (वॉश रूम) आहे का ? त्याच बरोबर सुरक्षेचा विचार करता प्राथमिक उपचार पेटी, सीसीटीव्ही कॅमेरे, आपत्कालीन परिस्थितीत ज्वलन प्रतिरोधक साधनं (फायर किट) आहेत का ? तसेच शाळेचे बिल्डिंग फिटनेस कसे आहे ? या बाबींची इत्यंभूत चौकशी करण्यात यावी.

# कृषि वृक्षी कन्यांचा एकच ध्यास ज्यामुळे वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन सोहळा गेला पूर्णत्वास

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.७ जुलै

शासकीय कृषी महाविद्यालय, अंबाजोगाई अंतर्गत ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक जागरुकता उपक्रमाअंतर्गत, कार्यक्रम समन्वयक डॉ. विद्या तायडे व कार्यक्रम अधिकारी डॉ. दिपक लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०४ जुलै रोजी जि. प. प्राथमिक शाळा, चनई ता. अंबाजोगाई येथे व कृषी महाविद्यालय अंबाजोगाईच्या विद्यार्थिनी (कृषि कन्या) यांच्या वतीने वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन कार्यक्रम राबवण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चनई गावच्या सरपंचा सौ. रोहीणीताई प्रभाकर सावरे यांनी स्विकारले होते, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन कृषि महाविदयालय अंबाजोगाई येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. दिपक लाखेड सर, डॉ. जाधव सर, डॉ. बोंडे सर आणि चनई ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी लक्ष्मन देशमाने लाभले होते. आदरणीय पंडीत काकडे सर प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. या प्रसंगी नींब, उंबर, कारंज, इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न व्हावा म्हणून कृषी कन्या - कु योगिता उगले, कु. ब प्रतिक्षा वाघचौरे, के धनप्री कुंभार, कु प्रतिक्षा वाघमोडे, कु प्रतिक्षा बाबर बाबर, कु रोहीणी मान, कु शिंदे निकीता, कु. १९ भुवनेश्वरी शिंगटे, कु कल्पना धुळोदटे, कु रोहीणी राऊत, कु. ज्ञानेश्वरी बेले, कु. अभिलाषा खोडके, कु. शितल काशिद, काशीद या यांनी परिश्रम घेतले. तसेच गावचे उपसरपंच मा. अनिल शिंदे यांनी देखील वेळोवळी मदत केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. योगिता उगले हीने केले, प्रास्ताविकक रोहीणी राऊत हीने मांडले तर आभार कु-धनश्री कुंभार हीने मानले.या एका अपूर्व सोहळ्याला समस्त चनई गावचे ग्रामपंचायत सदस्य व गावकरी, शेतकरी मंडळी तर आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विदयार्थी उपस्थित होते.

# कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात आषाढी एकादशी निमित्त मोठ्या थाटामाटात व उत्साहात बालगोपालाच्या दिंडीचे आयोजन

तभा वृत्तसेवा
गेवराई दि.७ जुलै

आषाढी एकादशी निमित्त लाखोच्या संख्येने वारकरी भक्त पंढरपूर मध्ये विठ्ठलाच्या दर्शनासाठी दाखल होतात आषाढ महिन्यात शुक्ल पक्षात येणाऱ्या एकादशीला देवशयनी आषाढी एकादशी असे म्हणतात.



कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रुक्माई यांची पालखी मोठ्या थाटामाटात सजवण्यात आली. विद्यार्थी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भारतीय संत परंपरे नुसार वारकरी वेशभूषा विविध संतांची वेशभूषा साकारून वारकरी संप्रदायाप्रमाणे सहभागी झाले. याप्रसंगी संस्कार केंद्रप्रमुख मा श्री. प्रदीप जोशी सर व सर्व शिक्षकवृंदांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भगवे झेंडे टाळ मृदंग मुखात अखंड हरिनामाचे नामस्मरण करीत दिंडी शाळेच्या प्रांगणातून राऊत नगर, कोर्ट रोड वडगावकर हॉस्पिटल ,मत्स्योदरी ज्ञानमंदिर, तसेच रमेश शहाणे यांच्या घरात पासून विठ्ठल रुक्माई मंदिर या ठिकाणी पोहोचली. दिंडी चालत असताना विद्यार्थ्यांने फुगडी विविध ,लेझीम प्रात्यक्षिक ,पावली ,विठुरायांचा नामस्मरण करीत भगवंताच्या भेटीचं आनंद घेतला. विविध ठिकाणी माता पालक यांनी पालखीचे पूजन करून पुष्पवृष्टी करण्यात आले. भक्तिमय वातावरणामुळे परिसर आनंदाने दुमदुमून गेले.

# ॲड.प्रकाश मुंडे यांची परळी वैद्यनाथ तालुकाध्यपदी निवड

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.७ जुलै




काँग्रेसचे पक्षाचे धडाडीचे युवक नेते तथा तालुक्यात मोठा जनसंपर्क असलेले अँड. प्रकाश बाबुराव मुंडे यांची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या परळी वैद्यनाथ तालुकाध्यपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री अशोक पाटील साहेब व बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. यानिवडीबद्दल नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष अँड.प्रकाश बाबुराव मुंडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या परळी वैद्यनाथ काँग्रेसच्या तालुकाध्यपदी अँड.प्रकाश बाबुराव मुंडे यांची निवड नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे. या बाबत दिलेल्या पत्रकात म्हटले की, महाराष्ट्र राज्य प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या आदेशानुसार परळी वैद्यनाथ तालुकाध्यपदी निवड करीत आहे.

# काँग्रेस परळी शहराध्यक्षपदाची माळ पुन्हा (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांच्याच गळ्यात

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.७ जुलै

राज्यात काँग्रेसच्या वतीने पक्षाची पुन्हा नव्याने बांधणी करण्यासाठी पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येत असून बीड जिल्ह्यातील निवडी करण्यात आल्या असून परळी शहर अध्यक्ष पदाची ही निवड करण्यात आली असून काँग्रेस परळी शहराध्यक्षपदाची माळ पुन्हा (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांच्याच गळ्यात टाकली आहे.या निवडीमुळे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.



माजीमंत्री अशोक पाटील व बीड जिल्हा कांग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष जिल्हा अध्यक्ष श्री राहुल सोनवणे यांनी आज शुक्रवारी (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांना परळी शहर अध्यक्ष पदाच्या निवडीचे पत्र देण्यात आले.निवडीच्या दिलेल्या पत्रात नमूद केले आहे कि,महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या आदेशानुसार मी आपली वै. परळी शहर काँग्रेस अध्यक्ष पदी निवड करीत आहे.आपणास जाणीव आहे की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जुन खर्गे साहेब, देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी, देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. राहुलजी गांधी, अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, महाराष्टाचे प्रभारी श्री. रमेश चेन्नीथलाजी, बीड जिल्हा प्रभारी मा. श्री. देविदासजी भन्साळी, हे विद्यामान भाजप सरकारच्या जातीय व धार्मिक तेड निर्माण करणाऱ्या धोरणावर तसेच सर्व सामान्य जनतेला भेडवसावण्याच्या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभीर विषयावर जागरुकता निर्माण करण्यासाठी दिवस रात्र मेहनत घेत आहेत. धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यत व देशात आणण्यासाठी मेहनत घेत आहेत.आपणही काँग्रेसच्या मार्फत पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रचंड मेहनत घ्याल याची मला खात्री आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे व आपले सर्वांचे लाडके नेते अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जुन खर्गे साहेब, देशाच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी. व आपले सर्वाचे लाडके नेते देशाचे विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. खासदार राहुलजी गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ साहेब, अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला सर्वसामान्यांना हाक्काचे व्यासपिठ निर्माण करण्यासाठी आपण दिवस-रात्र मेहनत घ्याल अशी आशा व्यक्त करतो असे नमुद केले आहे.काँग्रेस परळी शहराध्यक्षपदाची माळ पुन्हा (हानिफ करीम सय्यद) बहादुरभाई यांच्याच गळ्यात टाकली असुन पुन्हा काँग्रेस शहरात अधिक बळकटीने काम करेल अशी अपेक्षा काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.यावेळी जेष्ठ नेते प्रकाशराव देशमुख,अँड. शशीशेखर चौधरी, एहेतेशाम खतीब, सुभाष राव देशमुख, दीपक सिरसाट, बदर भाई, रसुल खान, व फरकुद आली बेग अदी नेते पदाधिकारी उपस्थित होते.

# आदर्श गुरुकुलचा दिंडी सोहळा उत्साहात साजरा



**आषाढी वारीचा भक्तिमय उत्सव; चिमुकल्यांच्या टाळ-मृदंग 'विठ्ठल नामा'चा गजर!**

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.७ जुलै

भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,आदर्श गुरुकुलची आषाढी एकादशीनिमित्त दि.६ रविवार रोजी बाल दिंडी उत्साहात करण्यात आली. आर्ट ऑफ लिविंगचे शिक्षक नंदकुमारजी शिंदे , मार्गदर्शक केशव बादाडे, रामजी फपाळ, गोकुळ सोळंके, संचालक ओंकार बादाडे या मान्यवरांनी पांडुरंगाच्या मूर्तीचे पूजन केले.

विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताई आदींच्या वेशभूषाने तसेच डोक्यावर ग्रंथ, तुळशीवृंदावन, कलश घेऊन उपस्थितांचे मन जिंकले.टाळ- मृदंग वाजवत,पावल्या, आणि फुगड्या खेळत, ज्ञानोबा- तुकाराम जयघोष करत भक्तीरसात नहालेल्या वातावरणात केशवराजाच्या चरणी निस्सिम भक्ती अर्पण केली. वेशभूषेतील बालगोपालांनी शिक्षण, पर्यावरण रक्षण, सामाजिक बांधिलकी, महिला सन्मानाचा सामाजिक संदेश दिला. दिंडीच्या मार्गावर जागोजागी फराळ, फळे,चहा वाटप होता त्याचा आस्वाद घेतला. सर्व विद्यार्थी शिक्षक कर्मचारी यांनी श्री. केशवराजांच्या मंदिरात शिस्तीत रांगेत दर्शन घेतले. आदर्श गुरुकुल मध्ये आल्यानंतर शिक्षक कर्मचाऱ्यांनी आनंदाने फुगड्या खेळल्या आणि प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमासाठी सुमनबाई रणेर,सावित्री बादाडे, कोमल काळे, अंजली घाडगे, नितीन शेंडगे यांनी परिश्रम घेतले.

# बालकांचे विश्वस्त होऊन त्यांचा जीवनात सहप्रवासी व्हा!-अमोल मुंडे

## गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व पालक मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.७ जुलै



केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे या ब्रीदवाक्याला साक्ष देते येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयातील पालक मेळावा आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा अत्यंत भव्य आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या वेळी अध्यक्षस्थानी शाळेचे शालेय समिती अध्यक्ष मा.श्री.उन्मेष दादा मातेकर, प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री अमोल मुंडे (वनपरिक्षेत्र अधिकारी), भा. शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य मा.श्री रामकाका कुलकर्णी, शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री शिवाजीराव हेंडगे, प्रगती वर्गाच्या विभाग प्रमुख सौ.वर्षाताई मुंडे, पालक मेळावा प्रमुख श्रीधर चौरे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय वातावरणात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री हेंडगे सरांनी केले. २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षातील स्पर्धा परीक्षा,त्याची विस्तृत माहिती व नियोजन याविषयी कृष्णा वाघमारे यांनी माहिती सांगितली.

कार्यक्रमात शाळेतील *३२* गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार गुलाबपुष्प,सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करताना संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले. सत्कारावेळी विद्यार्थी व पालक यांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे व आनंदाचे तेज स्पष्टपणे झळकत होते. यावेळी इयत्ता दुसरी ते चौथी मधील एकूण २३६ पालकांची उपस्थिती होती.



परळी तहसील कार्यालयाचे कर्तव्यदक्ष तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना परळी शिवसेनेचे शहर प्रमुख वैजनाथ माने

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आर्थिक साक्षरतेतूनच आर्थिक सुरक्षितता मिळू शकते -सीए शर्मा

## रोटरी क्लबतर्फे चार्टर्ड अकाउंटंट्स आणि कंपनी सेक्रेटरीजचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

संपत्ती प्रत्येकाकडे आहे. देशही आर्थिकदृष्ट्या संपन्न बनत आहे. मात्र, वाढते सायबर गुन्हे आणि ऑनलाईन व्यवहारातील फसवणुकीमुळे सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे लागणार आहे. आर्थिक साक्षरता ही आर्थिक सुरक्षिततेकडे जाणारी पहिली पायरी असून, आर्थिक साक्षरतेतूनच खऱ्या अर्थाने आर्थिक सुरक्षितता मिळू शकते. यासाठी आर्थिक साक्षरतेतून सुरक्षिततेकडे यावर रोटरीने काम करावे, अशी अपेक्षा इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे केंद्रीय परिषद सदस्य सीए उमेश शर्मा यांनी येथे बोलताना व्यक्त केली. यासाठी सीए असोसिएशनचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.



रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे शनिवार दि. ५ जुलै रोजी सीए डे निमित्त शहरातील चार्टर्ड अकाउंटंट्स व कंपनी सेक्रेटरीज यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सीए शर्मा बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे माजी प्रांतपाल तथा रोटरीचा सर्वोच्च जागतिक सर्विस अबाऊ सेल्फ पुरस्कार प्राप्त पंकज शाह हे उपस्थित होते. व्यासपीठावर रोटरीच्या नूतन अध्यक्ष वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख सीए बीजल भायानी, सीए प्रसाद राव यांची उपस्थिती होती. यावेळी सीए उमेश शर्मा पुढे म्हणाले की, अतिथी देवो भव ही भारताची संस्कृती आहे. भारताने कधीच कुणावर आक्रमण केलेले नाही. सोन्याची चिडिया म्हटले जाणाऱ्या भारतावर आक्रमण करून संपत्ती लुटण्यात आलेली आहे. मात्र, स्वातंत्र्यानंतर एक सशक्त व्यवस्था अर्थात बिल्डिंग इकोसिस्टीम विकसित झाली आणि त्या माध्यमातून शिक्षण, मार्गदर्शन, रोजगार, उद्यमशीलता, मदतसंस्था, समाजकार्य यांचा समन्वय समन्वय साधला गेला. आज भारत तिसऱ्या आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असून, कोणी बाधा आणू नये यासाठी आर्थिक सुरक्षिततेच्यादृष्टीने प्रयत्न होण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाला आर्थिक साक्षर केले तरच आर्थिक सुरक्षितता प्राप्त होऊ शकते. तरुणांना आणि नागरिकांना पैशाचं योग्य नियोजन कसं करावं, उत्पन्नावर किती कर भरावा, कोणत्या सवलती मिळू शकतात, याबद्दल माहिती असणं अत्यंत गरजेचं आहे. हे काम रोटरीच्या माध्यमातून हाती घेतले गेल्यास त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सीए मंडळी तयार आहे, असे सांगून त्यांनी आर्थिक व कर साक्षरता वाढवण्यावर भर देण्याची गरज व्यक्त केली. माजी प्रांतपाल पंकज शाह म्हणाले की, रोटरी हे समाजसेवेचे उत्कृष्ट माध्यम आहे. रोटरीच्या माध्यमातून जागतिक पातळीवर शिक्षण, स्वच्छता, शांतता, आरोग्य या विषयावर कार्य केले जाते. सदस्य शुल्क आणि डोनेशनच्या माध्यमातून संकलित होणाऱ्या रकमेतून हे कार्य केले जाते. रोटरीला दिलेले डोनेशन सत्पात्री लागते, असे ते म्हणाले. डी. बी. सोनी यांनी या कार्यक्रमाचा उद्देश विशद करून रोटरीला निधी कसा प्राप्त होतो, याबाबत माहिती दिली. याप्रसंगी रोटरीचे मावळते अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया यांनी मोठ्या प्रमाणात डोनेशनचे योगदान देणारे घनश्याम गोयल, समीर अग्रवाल, दिनेश भारूका, सीए उमेश झंवर, केशव पित्ती आदी मान्यवरांचे आभार व्यक्त केले. त्यानंतर सीए असोसिएशनचे अध्यक्ष कल्पेश लड्डा आणि उपस्थित सर्व चार्टर्ड अकाउंटंट्स आणि कंपनी सेक्रेटरीजचा सन्मान करण्यात येऊन समाजात पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि वित्तीय शिस्त निर्माण करण्यात मुलाचे योगदान दिले जात असल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूतन अध्यक्ष वर्षा पित्ती यांनी केले तर आभार नूतन सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांनी मांडले.

या कार्यक्रमाला रोटरीचे ज्येष्ठ सदस्य आणि रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लघु व मध्यम उद्योगांच्या अडचणी सोडविणार -आ.अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

रोजगार निर्मितीसह अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात लघु व मध्यम उद्योगांचे महत्त्वपूर्ण योगदान असून उद्योजकांच्या अडचणी शासन स्तरावर मांडून सोडविणार असल्याची ग्वाही महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

जालना लघु उद्योग भारतीच्या वतीने रविवारी ( ता. ०६) हॉटेल सॅफरॉन येथे दुसरी मासिक बैठक, व्याख्यानात आ. खोतकर बोलत होते. लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल, वक्ते नंदकिशोर बाहेती, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. आ. अर्जुनराव खोतकर यांनी उद्योजकांशी संवाद साधत अडी- अडचणी समजून घेतल्या. नंदकिशोर बाहेती यांनी यश : परिणाम नव्हे सतत यात्रा या विषयावर मार्गदर्शन करतांना उद्योगात यश मिळवण्यासाठी सातत्य ,चिकाटी आणि दूरदृष्टी आवश्यक असून संघर्ष हा यशाचा एक भाग आहे .प्रत्येक अपयशातून शिकत पुढे जाणे हेच खरे यश असल्याचे बाहेती यांनी सांगितले. सुत्रसंचालन संजय अग्रवाल आणि विजेंद्र बांगड यांनी केले तर पियुष मुंदडा. यांनी आभार मानले. बैठकीस लघुउद्योग भारतीच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कॅन्सर व्हॅनद्वारे कर्करोग तपासणी शिबीरांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

कॅन्सर व्हॅन जालना जिल्हयामध्ये दि.१ जुलै २०२५ मध्ये ते ३१ जुलै २०२५ पर्यंत विविध ठिकाणी भेट देऊन कर्करोग निदान, तपासण्यासाठी पाठपुरावा करण्यांत येणार आहे. सदरील मोहिम गाव पातळी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा स्तरापर्यंत राबविण्यांत येणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी कळविले आहे.

सदरील मोहिमे मध्ये, वैद्यकिय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, डेंन्टीस्ट यांच्या मार्फत तपासणी करण्यांत येणार आहे. आरोग्य कर्मचारी व आशा सक्रीय सहभाग घेतील. जिल्हयातील ३० वर्षावरील पुरुष/स्त्री यांनी तपासणी करुन घ्यावी. यामध्ये मौखिक, स्तन व गर्भाशयमुख कर्करोगाची तपासणी करण्यात येणार आहे. सदरील व्हॅन द्वारे कर्करोगाबाबत लवकर निदान होणे, प्रतिबंध करणे, उपचार व जीवनशैलीचा वापर इत्यादी विषयी जनजागृती करणे हे उदिद्ष्ट आहे. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उदिद् ष्ट कर्करोगाचे प्रमाण व मृत्यू कमी करणे असुन कर्करोगापासुन बचाव कसा करावा या बाबतची माहिती बाबत जनजागृती करण्याचे उदिद्ष्ट आहे. मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोगाचे प्रमाण जास्त असल्याने या अनुषगांने खालील प्रमाणे गांवनिहाय कॅन्सर तपासणी होणार आहे. १ जुलै २०२५ जिल्हा स्त्री रुग्णालय, जालना, २ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र दुधना काळेगाव, ३ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र मानेगांव, ४ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र पिरपिंपळगांव, ७ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र वाकुळणी, ८जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र सोमठाणा, ९ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र केदारखेडा, १० जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र रे. पिंपळगांव, ११ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र धावडा, १४ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र खासगांव, १५ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र कुंभारझरी, १६ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र डोणगांव, १७ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र शहागड, १८ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र वडीगोद्री, २१ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र सुखापुरी, २२ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र राणी उंचेगांव, २३ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र जिरडगांव, २४ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र रांजणी, २५ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र वाटुर, २८ जुलै २०२५ ग्रा.रु.परतुर, २९ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र श्रीष्टी, ३० जुलै२०२५ प्रा.आ.केंद्र पाटोदा, ३१ जुलै २०२५ प्रा.आ.केंद्र दहीफळ खंदारे नागरिकांनी या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी आवाहन केले आहे.

# संक्षिप्त

## आषाढी एकादशीनिमित्त बालविकास शाळेच्या विद्यार्थ्यांची पालखीसह दिंडी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

कसबा येथील महिला मंडळ जुना जालना संचलित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेच्यावतीने दि. ५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त पालखीसह दिंडी काढण्यात आली.

शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व आकर्षक पोशाख परिधान केले होते, या दिंडीत बालवाडी ते सातवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल! या नादाने शालेय परिसर विठ्ठलमय झाला होता. शाळेपासून कसबा, माळीपुरा, गांधी चमन या परिसरातून ही दिंडी पुन्हा शाळेत परतली. यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता परदेशी यांनी दिंडीचे महत्त्व विशद केले. यावेळी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. सीमाताई देशपांडे, सचिव सौ. विद्याताई कुलकर्णी, कोषाध्यक्ष सौ. सुनंदाताई बदनापूरकर, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरोग्य विभागाकडून टीबीमुक्त ग्रा.पं.चा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत टीबी मुक्त झालेल्या ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र वडीगोद्री अंतर्गत टाका, कोळी शिरसगाव, झोडेगाव, चंदनापुरी बुद्रुक आणि दाढेगाव या ग्रामपंचायतींनी आरोग्य विभागाला सहकार्य करून गाव टीबी मुक्त करण्यासाठी परिश्रम घेतले. प्राथमिक आरोग्य केंद्र वडीगोद्रीच्या वतीने तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिल वाघमारे यांच्या हस्ते टीबी मुक्त ग्रामपंचायतीच्या सरपंचांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी टीबी आजाराविषयी डॉ. अनिल वाघमारे आणि आरोग्य सहायक निकम यांनी मार्गदर्शन केले. टीबी मुक्त भारत अभियानासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली समुदाय आरोग्य अधिकारी मोरे, भांगे, डॉ. सानप, आरोग्य सेवक वासुदेव गवळी, मस्के, अनिल शिरसाट, योगेश बळी, सिद्धार्थ मगरे, आरोग्य सेविका पठाण, पुरी, वारे, वाहन चालक ठाकूर आणि आशा कार्यकर्ती यांनी परिश्रम घेतले

# जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या हस्ते सिरसवाडी येथे स्मशानभूमीचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मौजे सिरसवाडी ता. जालना येथे माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या खासदार निधी २०२३-२४ अंतर्गत बौद्ध समाज स्मशानभूमीच्या भूमिपूजन समारंभाचे आयोजन दि.०७ जुलै २०२५ रोजी करण्यात आले.



या कार्यक्रमाचे भूमिपूजन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री.भास्कर आबा दानवे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमा प्रसंगी भागवत बावणे, डॉ. अनिल सरकटे, संजय डोंगरे, सौ. वंदनाताई ढगे, सागर वाहुळकर, सरपंच श्री. रवी ढगे, शिवाजी ठोंबरे, जनार्धन ढगे, विष्णू ढगे, मा. सरपंच सर्जेराव शिंदे,उपसरपंच श्रीहरी ढगे, कृष्णा गायके, उद्धव ढवळे, सुभाष गाडगे, बंडू पाटील ढगे, रतन वाहुळकर, सावळाराम वाहुळकर, सर्जेराव वाहुळकर, प्रदीप वाहुळकर, कुंडलिक वाहुळकर, गौतम वाहुळकर, सुरेश वाहुळकर, रवींद्र गायकवाड, अशोक हिवाळे, नंदकुमार हिवाळे, दिलीप हिवाळे, सुरेंद्र गायकवाड उपस्थित होते. यावेळी आबा दानवे म्हणाले, स्मशानभूमीचे काम दर्जेदार व उत्तम दर्जाचे व्हावे व तसेच हा उपक्रम बौद्ध समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, ग्रामविकासाच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल आहे.

# पारधच्या पाणंद रस्त्याचे काम प्रगतिपथावर

## रस्त्यामुळे शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी होणार सोईचे



> पारध परिसरामध्ये जवळपास दहा ते पंधरा किलोमीटर पर्यंत पांदण रस्ते लवकरच तयार होणार आहे, पारद हा परिसर पाण्याचा भाग असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात मिरची व फळ लागवड केली जाते त्यामुळे शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतातून माल बाहेर काढण्यासाठी कसरत करावी लागते,त्यामुळे पारध परिसरात लवकरच पांदण रस्ते तयार होईल त्यामुळे पारध परिसर सुजलाम सुपलाम होईल.
> **-आमदार संतोष पाटील दानवे**

> जुने पाणंद रस्ते खुले झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी आणि मालाची वाहतूक करण्यासाठीचा हक्काचा मार्ग मिळाला आहे. यामुळे वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या जनावरांना येताजाता होणारा त्रास बंद होणार आहे. **-परमेश्वर लोखंडे, मा.पंचायत सभापती**

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथे पांदण रस्ते पुरातत्वाकडे भोकरदन जाफ्राबाद मतदारसंघाचे आमदार संतोष पाटील दानवे यांनी पारध येते विजय सभेमध्ये शब्द दिला होता की लवकरच पारध येथे पांदन रस्त्यांना पहिले प्राधान्य देणार व शब्द तो आज आमदार साहेबांनी पूर्ण केला, गेल्या काही वर्षांपासून पादण रस्ते नसल्यामुळे पारध येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्या येण्यासाठी रस्ता नसल्यामुळे जनावरांना,स्वतःच्या मालासाठी व शेतकरी पारध परिसरात पाणी जास्त असल्यामुळे भाजी पाल्याची लागवड व मिरची लागवड करतात त्यामुळे शेतातून पीक बाहेर काढताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागते पण आज पारध येथील ऋषी बाबा मंदिर ते अवघडराव सांगवी शाळेपर्यंत पांदण रस्ता झाल्यामुळे शेतकऱ्यांचे पुन्हा चांगले दिवस येतील. त्यामध्ये पारध परिसरात पूर्ण नऊ किलोमीटर पेक्षा जास्त रस्ता पूर्ण होणार आहे,यामध्ये आज एक किलोमीटर पांदण रस्ता पूर्ण झाला.यामध्ये माजी. सभापती परमेश्वर पाटील लोखंडे, माजी. सरपंच गणेश पाटील लोखंडे, अशोक लोखंडे, पंचायत समिती गणेश लोखंडे, शिवा लोखंडे, संजय पा लोखंडे, पवन लोखंडे, भानुदास लोखंडे, विठ्ठल लोखंडे, देविदास तेलंग्रे, साहेबराव तेलंग्रे, भगवान तेलंग्रे, अविनाश देशमुख, फैयाज खान, संतोष लोखंडे, ज्ञानेश्वर बोराडे, लक्ष्मण लोखंडे, सांडू सपकाळ, साहेबराव सुरडकर, पांडुरंग लोखंडे या शेतकऱ्यांनी आमदार संतोष पाटील दानवे यांचे आभार व्यक्त केले.

# चेतन बायस यांच्या घरी फुलले ब्रह्मकमळ



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

ब्रह्मकमल हे दैवी कृपेचे एक रूप मानले जाते. त्यात औषधी गुणधर्म देखील आहेत. हे फूल हिमालयात खूप उंचीवर आढळते. दैवी आणि औषधी शक्तींनी परिपूर्ण ब्रह्मकमल हे जाफराबादतील बायस कुटुंबात फुलले. त्यामुळे या कुटुंबात आनंदाची लाट आहे.

जाफराबाद येथील रहिवासी संपादक चेतन किशोरसिंग बायस यांच्या घरी ब्रह्मकमल फूल फुलले आहे. या दुर्मिळ फुलाच्या फुलण्याने बायस यांच्या कुटुंबात आनंद पसरला आहे. कुटुंब स्वतःला धन्य मानत आहे. फुलाच्या फुलाबरोबर चेतन बायस यांच्या कुटुंबात पूजा सुरू झाली. हे फूल चोवीस तासांत बंद होऊ लागले. फुलाच्या फुलाची बातमी पसरताच बायस कुटुंबातील मित्रांची गर्दी झाली. लोक ते पाहून स्वतःला आशीर्वाद देण्यात व्यस्त होते. जाफराबादेत फुललेल्या या ब्रह्मकमलची लक्षणे पुराणात सांगितल्याप्रमाणेच असल्याचे आढळून आले. हे फूल रात्री आठ वाजता उमलण्यास सुरुवात झाली आणि चोवीस तासांत बंद होते. चेतन बायस आईने व पत्नी ने नाशिकमधील त्यांच्या ताईच्या घरातून हे रोप आणले होते. त्यांनी सांगितले की सुमारे एक वर्षां पूर्वी श्रावण महिन्यात पाच ब्रह्मकमल दिसले होते. या कमळाचा वरचा भाग जांभळ्या रंगाचा आहे आणि पाकळ्या हिरव्या-पिवळ्या रंगाच्या आहेत. ब्रह्मकमल हे उत्तराखंड राज्याचे राज्य फूल आहे. बद्रीनाथ आणि केदारनाथ मंदिरात हे फूल अर्पण करण्याचे विशेष महत्त्व आहे.

# प्रशासनाला चुना लावणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठिशी घालण्याचे काम करताहेत बिडीओ तांगडे!

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

सर्वसामान्य नागरीकांचे हित व्हावे यासाठी शासन विविध योजनेंच्या माध्यमातुन कोट्यावधी रूपयांचा निधी ग्रामपंचायतीला देत असतो परंतु प्रशासनातीलच काही अधिकारी हे विविध योजनेच्या माध्यमातुन मंजुर झालेल्या निधी अंतर्गत निकृष्ट दर्जाचे कामे करून आणि भ्रष्टाचार करून शासनालाच चुना लावण्याचे काम केल्याचे परतुर तालुक्यातील वैजोडा येथील बोगस कामांवरून लक्षात येत आहे, आणि या बोगस कामे करणारे आणि त्यांना सहकार्य करणारे प्रशासनातील कर्मचारी असुन त्यांना परतुर पंचायत समितीचे बिडीओ तांगडे हे पाठीशी घालण्याचे काम करत असल्यामुळे त्यांच्या विरूध्द वैजोडा येथील ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.



याबाबत अधिक वृत्त असे की, मौजे वैजोडा येथील सरपंच, ग्रामसेवक, इंजीनिअर, गुत्तेदार सरपंच पुत्र गिरी याने केलेल्या विकास कामांचा भ्रष्टाचाराची चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावे या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अशोक साबळे यांनी आमरण उपोषण केले मात्र परतुर पंचायत समितीचे बिडीओ राजेश तांगडे यांनी भ्रष्टाचार केलेल्या अधिकारी यांनाच चौकषी समितीत समावेश केला आसल्याने चोराच्या उलट्या बोंबा म्हणणे वागवे ठरणार नाही . ज्यांनी विकास कामांमध्ये ।भ्रष्टाचार करत शासनाच्या निधिवर डल्ला मारला त्याच अधिकाऱ्यांना चौकशी करण्यासाठी पाठविले हे किती योग्य आहे . ते काय चौकशी करतील याचा विचारही केला नसेल असो मात्र ग्रामसेवक धरत यांच्या संबंधीत प्रकरण अंगलट येतय समजताच त्यांनी परतुर पंचायत समितीचे बिडीओ यांना हाताशी धरून स्वत:ची इतर ठिकाणी बदली करूण घेत संबंधीत प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत आहे. याबाबत आता वरिष्ठांनीच लक्ष घालुन कारवाई करण्याची मागणी देखील श्री.साबळे यांनी केली आहे.

# सराईत चोरट्यांना अटक; सहा लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०७ जुलै -**

नांदेड, दि.७ (प्रतिनिधी)- गावठी कट्टे वापरुन गळ्यातील चैन चोरुन नेणारे, घरफोडी करणारे व मोटारसायकल चोरी करणारे सात आरोपी नांदेडच्या स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने त्यांना आज अटक केली. त्यांच्याकडून ६ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड शहरात वेगवेगळ्या ठिकाणी विविध पोलीस ठाण्याच्या अंतर्गत चैन स्नॅचिंगचे, घरफोडी व मोटारसायकल चोरीचे प्रकार वाढले होते. त्यानुसार पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी स्थानिक गुन्हा शाखेला सदर प्रकरणाचा कसून तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार आसना पुलाजवळ काही जण गावठी कट्टे घेवून एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी शेख मोबीन शेख गौस रा.खदबईनगर, संजय दत्ता गुंडेवार रा.नंदीग्राम सोसायटी, रोहित ताटीपामुलवार रा.भावेकरनगर यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून तीन गावठी कट्टे व चार जिवंत काडतूसे जप्त केली. हे आरोपी गावठी पिस्टल देखील विकत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार लगेच स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने तरोडा शिवरोड येथेही काही आरोपी थांबले असल्याची माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांच्या पथकाने शिव रोड तरोडा येथे जावून आणखी तीन आरोपींना अटक केली. त्यात आरोपी अमन किशोर जोगदंड रा.खोब्रागडेनगर, राहुल माणिका लिंगायत, भोकर, मोहंमद अपताब अब्दुल खदीर रा.दिवानी बावडी इतवारा यांचा समावेश होता. त्यांच्या ताब्यातून एक गावठी कट्टा व तीन जिवंत काडतूसे जप्त केली आहेत. तसेच त्यांनी दिलेल्या माहितीनुसार राहुल चंद्रकांतराव रा.आंबेडकरनगर भोकर यासही ताब्यात घेतले. या सर्व आरोपीकडून वेगवेगळ्या गुन्ह्यातील मुद्देमाल, गावठी पिस्टल व मॅगझीन असा सहा लाख ८९ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी हि कारवाई केली.



# शेतकरी आणि आर्थिक दुर्बल घटकाच्या विकासास प्राधान्य : मिलिंद घारड

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.०७ जुलै -**

महाराष्ट्रातील शेतकरी आणि आर्थिक दुर्बल घटकात मोडत असलेल्या मागास प्रवर्गाच्या विकासासाठी बँक सदैव प्रयत्नशील असून त्यांच्या विकासास प्रथम प्राधान्य देण्यात येत असल्याने महाराष्ट्रात महाराष्ट्र ग्रामीण बँक ही नागरिकांच्या प्रथम पसंतीस उतरली असल्याचे, प्रतिपादन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी माहूर शाखा स्थलांतर कार्यक्रमाच्या वेळी केले.

शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे स्थलांतर राष्ट्रीय महामार्गावरील टि पॉइंट जवळ असलेल्या हाजी कॉम्प्लेक्स च्या भव्य इमारतीत आज शनिवार ०५ जुलै रोजी सकाळी करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये नरेंद्र खत्री क्षेत्रीय व्यवस्थापक नांदेड ,नायब तहसीलदार निलेश राऊत पुरवठा निरीक्षक गजेंद्र मिरजगावे, अमोल अलकरी शाखा व्यवस्थापक,असिस्टंट जनरल मॅनेजर संतोष प्रभावती,माजी शाखा व्यवस्थापक दीपंकर पाटील,शाखा व्यवस्थापक (वाई बाजार) रोशन पेंदोर, श्री रेणुकादेवी संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी,जागा मालक हाजी हाशम शकूर मकराणी,किशोर जगत, आरिफ शेठ सूरैय्या,किसन राठोड, इर्शाद मकरानी,कमलेश कुमरे,विपीन गरमले,प्रतीक्षा तमगाडगे भाऊराव पाटील हडसणीकर,मनीष टोपरकवार,आफताब मकरानी, सुनील गोविंदवार ,नामदेव कातले,तौफिक मकरानी,श्री सुर्वे यांचे सह पत्रकार ,बँकांचे कर्मचारी, प्रतिष्ठित नागरिक, ग्राहक महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मिलिंद घारड यांनी पुढे बोलताना सांगितले की, महाराष्ट्र ग्रामीण बँक (चरहरीरीर्हीर त्रीराळप इरपज्ञ) ही महाराष्ट्रातील एक प्रादेशिक ग्रामीण बँक (ठशसळेपरश्र ठीरश्र इरपज्ञ) असून,ही बँक ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक विकासासाठी काम करते. बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेचे या बँकेला प्रायोजकत्व आहे.बँकेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील लोकांचे आर्थिक जीवनमान उंचावणे हा आहे. तसेच कृषी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, शिक्षण, गृहनिर्माण, सूक्ष्म-कर्ज, दुर्बल घटक, अनुसूचित जाती/जमाती समुदाय इत्यादी क्षेत्रांना आर्थिक सहाय्य देणे असल्याचे सांगितले.

तसेच संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ७५० शाखा आपली बँकिंग सेवा देत आहे ११७ कोटी रुपयांचा टर्न ओव्हर बँकेचा असून ग्राहकांच्या विश्वासावर ही बँक चालत असून ग्राहकांना सुविधा देताना जलद प्रक्रियेचा अवलंब होत असल्याने नागरिकांचा बँकिंग व्यवहारात वेळ वाया जात नसल्याने महाराष्ट्र ग्रामीण बँक ग्राहकाच्या प्रथम पसंतीस उतरली आहे! असे सांगितले.यावेळी मान्यवरांनीही आपले मनोगत व्यक्त करून बँकेच्या नवीन वास्तू स्थलांतर कार्यक्रम आणि बँकेच्या भरभराटीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त वृत्त



### ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरीच्या वतीने स्मशान भूमी येथे वृक्षारोपण

**नवीन नांदेड -** ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिर देवस्थान लगत असलेल्या स्मशान भूमी येथे पंधराव्या वित आयोग व जिल्हा नियोजन समितीच्या जन सुविधा योजना अंतर्गत स्मशानभूमी परिसरात ग्रामपंचायत विष्णुपुरी कार्यालयच्या वतीने दिनांक ७ जुलै रोजी शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ.मनेश कोकरे यांच्या हस्ते विविध प्रजातीच्या वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिर देवस्थान लगत असलेल्या स्मशानभूमी येथे दिनांक ७ जूलै २०२५ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख व श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे व मान्यवरांच्या हस्ते समशानभूमी येथे मोठ्या प्रमाणात विविध प्रजातीच्या वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी विष्णुपुरी नगरीचे सरपंच प्रतिनिधी विलास हंबर्डे उपसरपंच प्रतिनिधी विश्वनाथ हंबर्डे यांच्यासह भार्गव राजे भार्गव करिअर अकॅडमी, काळेश्वर ट्रस्ट सचिव शंकर हंबर्डे, उत्तमराव हंबर्डे , बालाजी हंबर्डे सदस्य साहेबराव हंबर्डे, माणीकराव हंबर्डे , प्रवीण पंडित, प्रभू हंबर्डे, शिवाजी हंबर्डे , राजेश हंबर्डे,सोम महाराज, मारुती हंबर्डे, गोविंदराव हंबर्डे, नरसिंह हंबर्डे ,बालाजी हंबर्डे,माधव हंबर्डे ,चिंतामणी हंबर्डे, नारायण हंबर्डे ,अमृतराव हंबर्डे,संतोष बारसे, उत्तमराव हनवते,संजय कानवडे ग्राम विकास अधिकारी व जिल्हा परिषद शाळाचे मुख्याध्यापक उज्वला जाधव, सहशिक्षक विकास दिग्रसकर, कृष्णा बिरादार व स्काऊट गाईडचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### किरण बंडे यांनी केले मेतके बंधूंसाठी रेनकोट वाटप


**नांदेड-** यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथील नांदेड येथील जनसंपर्क अधिकारी किरण बंडे यांनी श्री संत बाळूमामा पालखी क्रमांक १२ येथील मेंढी पालन सेवेकऱ्यांसाठी पावसापासून सुरक्षेसाठी १७ रेनकोट चे वाटप केले. श्री संत बाळूमामा यांच्या मेंढ्यांचा कळप हा संपूर्ण महाराष्ट्रभर



भ्रमंती करत असतो सध्या पाणी पावसाचे दिवस आहेत त्यामुळे पावसापासून संरक्षण व्हावं या हेतूने मेंढ्यांच्या सेवेकऱ्यांना किरण बंडे यांनी सामाजिक भावनेतून ही मदत केली आहे. तसेच सध्या श्री संत बाळूमामा ची पालखी मुखेड तालुक्यातील शिकारा या गावी असून त्याबद्दल पालखीचे कारभारी श्री सुरनर यांनी नारळ व भंडारा देऊन त्यांचा सन्मान केला. किरण बंडे यांची बाळूमामा वरील असलेली श्रद्धा पाहून त्यांनी केलेल्या मेतके बंधूसाठी केलेल्या सेवेबद्दल सर्वच भाविकांकडून त्यांचे आभार मानण्यात येत आहे.

### मरीबा गायकवाड यांच निधन

**नरसी-** नायगांव तालुक्यातील नरसी येथील रहिवासी मरिबा पिराजी गायकवाड वय ७५ वर्ष यांच दि. ६ जुलै २०२५ रोजी रविवारी निधन



झाले आहे. मरीबा गायकवाड यांच्या पार्थिवावर दि. ७ जुलै रोजी सोमवारी दुपारी १२:३० वाजता नरसी ता.नायगाल जि. नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुल, एक मुलगी, सुना ,जावाई,नातू असा मोठा परिवार आहे. ते सामाजिक कार्यकर्ते संजय गायकवाड मसलगेकर व सुरेश गायकवाड मसलगेकर यांचे वडील होत. मरीबा गायकवाड हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते्. अंत्यविधीस गावातील नागरिक पाहुणे, मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार साठी १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

**नांदेड -** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

### टि.सी.हरवली

निकेश कोंडीबा सरकूंडे या नावाची इयत्ता बारावी उत्तीर्णची टि.सी.नांदेड भोकर बस प्रवासात गहाळ झाली असून कूणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा

**संपर्क पत्ता**
**कोंडीबा सरकूंडे**
**रा.आमदरीवाडी ता.भोकर जी.नांदेड.**

# इस्लापूर पोलीसांचा अवैध धंद्यावर पोलीसांचा छापा

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि.०७ जुलै -**

इस्लापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नंदगावतांडा, परोटीतांडा, रिठ्ठातांडा येथे चालत असलेल्या अवैध देशी, विदेशी व हातभट्टी दारू विक्रेत्यावर पोलीसांनी टाच आणली असून मास रेड अंतर्गत धडक कारवाई करून हजारो रूपयाचां मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. हि कारवाई शनिवार दि. ५ सकाळच्या दरम्यानं करण्यात आली आहे.

इस्लापूर पोलीस ठाण्याच्या हददीत अवैध दारू विक्री मोठयाप्रमाणात होत असल्याची माहीती मिळाल्यावरून पोलीसांनी धडक कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. नंदगावतांडा येथे एका किराणा दुकानातून देशी व विदेशी दारूची अवैध विक्री होत असल्याची गुप्त माहीती मिळालयावरून पोलीसांनी छापा टाकून विदेशी दारू मॅकडॉल नंबर वन दारूच्या ३४ बाटल्या किंमत ५ हजार ४४० रूपये, व तसेच देशी दारू भिंग्री संत्रा ३० बाटल किंमत १ हजार ५० रूपये असा एकूण ६ हजार ४०० रूपयाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. सरकारी कर्मचारी सहाययक पोलीस निरिक्षक उमेश भोसले यांच्या फिर्यादीवरून आरोपी अतूल वसंत जाधव वय २३ वर्ष याचे विरूद्ध दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. व तसेच दुसर्या कारवाईत पोकॉ. सुरेश मनोहर चव्हाण यांच्या फिर्यादीवरून आरोपी राम भिक्षू चव्हाण वय ३५ वर्ष रा. परोटीतांडा यांचेविरूद्ध कारवाई करण्य्यात आली असून त्यांचेकडून पाच निळ्या रंगाच्या प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या प्लॉस्टीकच्या डरम भरून १ हजार लिटर मोहमास सडवा अंदाजे किंमत ३० हजार रूपये व तसेच पाच लिटर क्षमतेची कॅन २५० असा एकून ३० हजार २५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तिसर्या,कारवाईत सपोनि. उमेश भोसले यांच्या फिर्यादीवरून आरोपी शेषेराव चंद्रू जाधव वय ५५ वर्ष रा. रिठ्ठातांडा याचेवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. आरोपीकडून विदेशीदारू मॅकडॉल नंबरवन ११ बाटल किंमत १ हजार ७६० रूपये, व तसेच देशी भिंगरी संत्रा दारू ४५ बाटल किंमत १ हजार ५७५ रूपये असा एकूण ३ हजार ३७५ रूपयाचा मुदेमाल पोलीसांनी जप्त केला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नागरीकांनी पोलीसांना सहकारय करावे. आपल्या गावात, परिसरात कोणत्याही प्रकारचा अवैध धंदा चालत असल्यास, त्याबाबतची माहीती पोलीसांना द्यावी. आपले नांव मात्र गुप्त ठेवण्यात येईल. सर्व नागरीकांनी कायदा सर्वोच्च समजून आपले राष्टीय कर्तव्य पार पाडावे. असे अवाहन सह्हाय्यक पोलीस निरिक्षक उमेश भोसले यांनी केले.

# लोहा शहरातील प्रभाग सात मध्ये रस्ता कामाचे भूमिपूजन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०७ जुलै -**

शहरातील प्रभाग ७ मध्ये जिल्हा नियोजन समिती (,डीपिडीसी) अंतर्गत २० लक्ष्य रुपये निधी प्राप्त झाला त्यामध्ये सिमेंट रस्ता व नाली या कामाचे भाजपाचे लोहा उतर मंडळ अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या हस्ते करण्यात आले

लोहा शहरात नगर परिषदेचा कार्ये काळ संपवुन अनेक दिवस झाले पण शहर विकासाची आवड असलेला कार्ये कर्ता शासन फंडातुन सर्व सामान्य चे काम करण्यात अग्रेसर आहे.भाजपाच्या नेतृत्वाखाली राज्य व केंद्र शासनाच्या



माध्यमातून प्रचंड प्रमाणात विकास होत असुन माजी उपनगराध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टी चे लोहा उतर मंडळ अध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या प्रयत्नातून त्यांनी जिल्हा नियोजन समिती नांदेड (डीपीडीसी) च्या माध्यमातून लोहा शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये २० लक्ष रु.निधी मंजूर करून घेतला आणि त्या निधीतून लोहा शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये सीसी रस्ता व नाली बांधकामाचा शुभारंभ केला

यावेळी शिवसेना शहरप्रमुख खंडू पाटील पवार, डी.एन. कांबळे, गोवर्धन पवार, सलीम शेट, पुंजाजी शेवडकर, यांच्यासह प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकस्वराज्य संघटनेचे महाएल्गार आंदोलन आझाद मैदानावर धडकणार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०७ जुलै -**

मुदखेड तालुक्यातील मातंग, मदिगा, मांग, गारुडी, बुरुड, होलार, मेहतर, ढोर, चर्मकार यांच्या आरक्षण वर्गीकरणासाठी, लोकस्वराज्य आंदोलन, व लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र भरांडे यांच्या नेतृत्वाखाली महाएल्गार आंदोलन दि. १० जुलै रोजी आझाद मैदान मुंबई येथे धडकणार. सर्वोच्च न्यायालयाने दि.१ ऑगस्ट २०२४ ला अनुसूचित जाती आरक्षणात उपवर्गीकरण करण्याची गरज असल्याचा क्रांतिकारीक निर्णय दिला. तो आमलात, आल्याशिवाय आणि आरक्षणात, उपवर्गीकरण केल्याशिवाय, अनुसूचित जातीचा व मातंग समाजाचा विकास होणार नाही, परंतु राज्य सरकार यावर लक्ष देत नसून, वेळ काढूपणा करत आहे. यामुळे सर्व मातंग समाजाने व लोकस्वराज्य आंदोलन मातंग समाज संघटना महाराष्ट्र राज्य, यांनी मातंग, मदिगा, मांग, गारुडी, बुरुड, होलार, मेहत्तर, ढोर, चर्मकार या सर्व समाजाला सोबत घेऊन, दि. १० जुलै रोजी महाएल्गार आंदोलन मुंबई येथे आझाद मैदानावर, आयोजित करण्यात आला आहे.

या आंदोलनात सर्व समाजातील समाज बांधव व लोकस्वराज आंदोलनाचे कार्यकर्ते, मोठ्या संख्येने साक्षीदार व्हावं, असे आवाहन लोकस्वराज्य आंदोलन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष रामचंद्र भरांडे यांनी केले आहे.

# खाजगी मेजवानीसाठी गुरुद्वारा बोर्डाचे पदाधिकारी विनापरवानगी गैरहजर

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०७ जुलै -**

गुरुद्वारा बोर्डाच्या एका माजी सचिवानी आयोजित केलेल्या खाजगी मेजवानीसाठी बोर्डाचे सर्व व पदाधिकारी,कर्मचारी यांनी विनापरवानगी गैरहजर राहिल्याने भाविकांची मोठी गैरसोय झाल्याने सदर कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देवेंद्र सिंघ तारासिंघ महाजन यांनी बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांच्याकडे केली आहे

गुरुद्वारा बोर्डाच्या एका उच्च पदस्थ माजी सचिव त्यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या गुरुद्वारा बोर्डाच्या मालकी जागा असलेल्या दाभड येथे मेजवानीचे आयोजन २४ जून २०२५ रोजी केले होते. सदर मेजवानी मध्ये मांसाहारासह म मध्य शौकिनांची जोरदार व्यवस्था करण्यात आली होती. माझी पदाधिकाऱ्यांच्या या वाढदिवसाचे दिवशी कोणत्याही प्रकारची शासकीय व अशासकीय सुट्टी नव्हती. असे असताना गुरुद्वारा बोर्डाचे जबाबदार असलेले चार अधीक्षक यांच्यासह जवळपास सर्व कर्मचारी या मेजवानीचा आस्वाद घेण्यासाठी दुपारी तीन नंतर कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना व परवानगी न घेता गेले होते.

देशभरातून आलेले भाविक व पर्यटकांना यामुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला असल्याचा आरोप करीत देवेंद्रसिंघ तारासिंघ महाजन यांनी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ व गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक स. गुरुबचन सिघ शिलेदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे तसेच अशा प्रकारचे आयोजन होऊ नये याकरिता कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे अन्यथा या विरोधात आमरण उपोषणाचा इशारा देखील देण्यात आला आहे. या प्रकरणी प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ हे कोणती कठोर कारवाई करतात याकडे गुरुद्वारा भागातील सर्व नागरिकाचे लक्ष लागले आहे.

# आईच्या तेरवीवरील खर्च टाळून बालगृहास मदत

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०७ जुलै -**

पोलिस दलात सेवा बजावतात सामाजिक दायित्व जपणाऱ्या पोलीस अधीक्षक कार्यातील जिल्हा विशेष शाखेतील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश भांडे यांनी आपल्या आईच्या तेरवीवर होणारा खर्च टाळून ५० हजार रुपयांची रक्कम सुमन बालगृहातील मुलींच्या उन्नतीसाठी मदत म्हणून दिली आहे. भांड यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. पोलीस दलातील तीस वर्षांमध्ये सेवा बजवणारे रमेश भांड हे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर सध्या कार्यरत आहेत.

# दीक्षित कुटुंबातील जोडीने पांडुरंगाच्या दरबारापर्यंत पोहचवला माहूरगडचा 'स्वच्छता खराटा'

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०७ जुलै -**

आषाढी एकादशीचा आनंदोत्सव पंढरपूरमध्ये दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होतो. महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी हजारो पायी दिंड्यांसह वाहनाने मोठ्या संख्येने वारकरी पंढरी नगरीत दाखल होतात.या आषाढ वारी यात्रा महोत्सवादरम्यान संपूर्ण पंढरपूरात राबविण्यात आलेल्या महास्वच्छता अभियानात माहूरगड येथील अजय शिवराज सिंह दीक्षित व त्यांच्या पत्नी सौ.नमिता अजय सिंह दीक्षित या वारकरी भाविक जोडीने विठ्ठल रखुमाई मंदिर भोवतालील संपूर्ण प्रदक्षिणा मार्ग स्वच्छ करत प्रसिद्ध तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र माहूरगडचा स्वच्छता खराटा पांडुरंगाच्या दरबारापर्यंत पोहचवत भक्ती मार्गातून स्वच्छतेचा संदेश दिला.

आषाढी एकादशी ज्याला देवशयनी एकादशी असेही म्हणतात ,ही भगवान विठ्ठल भक्तांसाठी महत्वाची तिर्थयात्रा आहे. या दिवशी, पंढरपूर मध्ये वारकऱ्यांचा सर्वात मेळावा होतो. जो पवित्र चातुर्मास काळाची सुरुवात



दर्शवितो. या काळात भाविक स्वतःला पूजा आणि भक्तीसाठी समर्पित करतात.या पवित्र काळात पांडुरंगाची सेवा घडावी यासाठी पंढरपूर येथे माहूर तालुक्यातील लखमापूर येथील प्रसिद्ध व्यावसायिक तथा राजपूत समाज संघटनेचे माजी माहूर तालुका अध्यक्ष अजय शिवराज सिंह दीक्षित व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. नमिता अजय सिंह दीक्षित या वारकरी जोडी सोबतच यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील काळी (टेंभी) येथील कुलदीप राऊत व त्यांच्या पत्नी सौ.रुपाली राऊत यांनी पांडुरंगाच्या पवित्र मंदिर संस्थानच्या परिसरात राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र माहूरगड येथील स्वच्छता खराट्याने मंदिराचा प्रदक्षिणा मार्ग स्वच्छ केला.

यावेळी व्यसन मुक्ती सम्राट (महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त) ह.भ.प.रामेश्वर महाराज खोडे तथा ह.भ.प.पवन महाराज खोडे हे दोन्ही संत दीक्षित जोडी सोबत होते. तसेच वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील भुली येथील १०० वारकरी महिला ह्या पायी दिंडी च्या माध्यमातून सौ. छायाताई डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली पांडुरंगाच्या दरबारात ग्राम स्वच्छता सेवेत सामील होत्या. दीक्षित ही जोडीने दि.२७ जूनला माहुर येथून निघून २८ रोजी त्यांनी विठ्ठल रखुमाई मंदिर संपूर्ण मंदिर भोवतालचा प्रदक्षिणा मार्ग झाडून स्वच्छ करत श्री क्षेत्र माहूरगडचा 'स्वच्छता खराटा' त्यांनी पांडुरंगाच्या दरबारापर्यंत पोहचवून वारकऱ्यांसह भाविक भक्तांमध्ये स्वच्छते विषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करत सर्वांपुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला. भक्ती मार्गातून स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या अजय दीक्षित व नमिता दीक्षित या वारकरी जोडीचे सर्वस्तरातून अभिनंदनासह कौतुक केले जात आहे.

# सातासमुद्रापार इंग्लंडमध्ये दुमदुमला विठ्ठल नामाचा गजर

## नांदेड जिल्ह्यातील कुटुंबांचाही सहभाग

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०७ जुलै -**

लंडनपासून सुमारे ७७ किलोमीटर अंतरावर असलेल्या बेशिंगस्टोक शहरात यंदा आषाढी एकादशीचा उत्साह शिगेला पोहोचला होता. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि वारी परंपरेचा अनुपम संगम परदेशी भूमीवर अनुभवताना येथील मराठमोळ्या कुटुंबीयांनी एकत्र येत विठ्ठल नामाचा गजर केला. टाळ-मृदुंगाचा गजर, हातात भगव्या पताका आणि फुगड्या खेळत साजरा झालेला हा आनंदोत्सव आषाढीच्या धुमधडाक्यात पार पडला. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील कुटुंबीयांनीही सहभाग नोंदवला होता.



या सोहळ्यात सहभागी झालेल्या भाविकांनी पारंपरिक वेशभूषा केली होती. संपूर्ण वातावरणात टाळ-मृदुंगाचा गजर निनादत होता, ज्यामुळे वारकऱ्यांच्या वारीतील चैतन्य अक्षरशः बेशिंगस्टोकमध्ये अवतरले होते. अनेक भाविकांनी आपल्या हातात भगव्या पताका घेऊन 'माऊली माऊली'चा जयघोष केला. महिलांनी मोठ्या उत्साहात फुगड्या खेळत आनंदोत्सव साजरा केला, ज्यामुळे महाराष्ट्रातील गावाकडच्या वारीचे चित्र परदेशातही साकार झाले.

बेशिंगस्टोकमधील या आषाढी महोत्सवाने तिथे स्थायिक झालेल्या मराठी बांधवांना एकत्र आणले. आपल्या संस्कृती आणि परंपरेशी जोडलेले राहण्याचा हा प्रयत्न या मराठमोळ्या कुटुंबीयांनी केला असून, परदेशातही महाराष्ट्राची 'वारी' परंपरा जिवंत ठेवल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. सातासमुद्रापार महाराष्ट्राच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा हा आविष्कार खरोखरच कौतुकास्पद आहे.